POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-१९८ ● मुंबई, गुरुवार, १९ फेब्रुवारी २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## मिरा-भाईदरची पहिली महासभा गाजली

### टिपू सुलतान चौकाचं नाव बदलण्याचा ठराव मंजूर, नवीन नाव काय असणार?



**■भाईदर। प्रतिनिधी,**

मिरा-भाईदर महापालिकेची पहिली महासभा आज गाजली ती टिपू सुलतान चौक हे नाव रद्द करण्यात येण्याच्या मुद्यावरुन. भाजपाचे संजय पवार यांनी महासभेत हा ठराव मांडला होता. याला कॉंग्रेस आणि शिवसेना शिंदे गटाच्या नगरसेवकांनी स्थापन केलेल्या मिरा भाईदर विकास आघाडीने हरकत घेतली होती. मात्र, लास्ट मुव्हमेंटला मिरा भाईदर विकास आघाडीने युटर्न घेत, टिपू सुलतान चौकच्या नावाऐवजी स्वातंत्र्य लढयातील महान नेता खान अब्दुल गफार खान यांच नाव सुचवलं तर भाजपाने थोर स्वातंत्र्यसेनानी अशफाक उल्ला खान यांच नाव सुचवलं. 77 विरुध्द 13 मताने अशफाक उल्ला खान यांच नाव देण्याचा ठराव बहुमताने मंजूर झाला आहे.

आजची महासभा अनेक विषयांनी गाजली होती. आमदार प्रताप सरनाईक यांनी मांडलेले अनेक विकास कामावर यावेळी आक्षेप घेण्यात आला. तसेच त्या कामांच्या चौकशीची मागणी देखील करण्यात आली. त्यात कोट्यावधी खर्च करुन बांधण्यात आलेलं स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे कलादान, चेना नदीवरील पूल, तेथील रस्ते हे विशेष करुन एका बांधकाम व्यावसायिकाच्या फायद्यासाठी झाल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. तसेच महासभेत जेवणाच्या वेळी पालिकेतर्फे ठेवण्यात आलेल्या व्हेज जेवणाचा मुद्दयावर ही काही नगरसेवकांनी आक्षेप घेत, नॉनव्हेज जेवणाची मागणी केली आहे.

## महाराष्ट्रात पुन्हा उडणार निवडणुकीचा धुरळा!

### सरकारकडून प्रभाग रचनेचा अधिकृत कार्यक्रम जाहीर

**■ बातमी /लेख,**
**प्रीती दिपक नाईक**

राज्यात नुकत्याच जिल्हा परिषद आणि नगरपंचायतीच्या निवडणुका पार पडल्या आहेत. त्याआधी महापालिका निवडणुकांचा रणसंग्राम पाहायला मिळाला. दरम्यान आता राज्यात पुन्हा एकदा निवडणुकांचा धुरळा उडणार असं दिसत आहे. राज्यातील ज्या ग्रामपंचायतींची मुदत जानेवारी २०२६ ते डिसेंबर २०२६ या कालावधीत संपत आहे. तसंच ज्या नवीन ग्रामपंचायती स्थापन झाल्या आहेत, त्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग रचनेचा अधिकृत कार्यक्रम राज्य शासनाने जाहीर केला आहे. त्यानुसार येत्या २० फेब्रुवारीपासून प्रभाग रचनेचे काम सुरू होणार असून, ग्रामपंचायतींची प्रारूप प्रभाग रचना ४ एप्रिल २०२६ रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे.



**अंतिम प्रभाग रचना ४ मे रोजी प्रसिद्ध**

ग्रामपंचायतींच्या प्रभाग रचनेबाबत हरकती मागविण्यासाठी ७ एप्रिल २०२६ रोजी तहसीलदार जाहीर सूचना प्रसिद्ध करतील. नागरिकांना आपल्या हरकती १३ एप्रिल २०२६ पर्यंत नोंदवता येतील. त्यानंतर १६ एप्रिलपर्यंत प्राप्त हरकती उपविभागीय अधिकारी यांच्याकडे सादर केल्या जातील. प्राप्त हरकतींवर २१ एप्रिल २०२६ पर्यंत उपविभागीय अधिकारी सुनावणी घेतील. जिल्हाधिकारी सर्व प्रस्तावांची पडताळणी करून २८ एप्रिल २०२६ पर्यंत प्रभाग रचना अंतिम करतील आणि ती राज्य निवडणूक आयोगाकडे सादर केली जाईल. दि. ४ मे २०२६ रोजी अंतिम प्रभाग रचना जिल्हाधिकारी प्रसिद्ध करणार आहेत.

ग्रामविकास विभागाने जाहीर केलेल्या या कार्यक्रमामुळे ग्रामीण भागातील राजकीय हालचालींना वेग येणार आहे. प्रभाग रचनेची प्रक्रिया तीन टप्प्यांत पार पडणार आहे. त्यामध्ये प्रारूप प्रभाग रचना तयार करणे, त्यावर हरकती व सूचना मागविणे आणि प्रभाग रचना अंतिम करणे यांचा समावेश आहे. या संपूर्ण प्रक्रियेची जबाबदारी तहसीलदार, उपविभागीय अधिकारी आणि जिल्हाधिकारी यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

तहसीलदार गुगल अर्थच्या मदतीने २० फेब्रुवारीपर्यंत गावांचे नकाशे अंतिम करतील. तलाठी आणि ग्रामसेवक २७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत संयुक्त प्रत्यक्ष पाहणी करून प्रभाग व त्यांच्या सीमा निश्चित करतील. त्यानंतर ३ मार्चपर्यंत गटविकास अधिकारी आणि मंडळ अधिकारी यांच्या समावेश असलेली तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखालील समिती प्रारूप प्रभाग रचनेची तपासणी करेल. ही समिती ११ मार्चपर्यंत प्रारूप प्रभाग रचनेचा प्रस्ताव उपविभागीय अधिकारी यांच्या मार्फत जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेसाठी पाठवेल.

जिल्हाधिकाऱ्यांकडून संक्षिप्त तपासणीनंतर २३ मार्च २०२६ पर्यंत राज्य निवडणूक आयोग या प्रस्तावाला मान्यता देईल, असे ग्रामविकास विभागाने म्हटले आहे. याबाबतचे आदेश ग्रामविकास विभागाच्या सहसचिव वर्षा भरोसे यांनी जारी केले आहेत.

## नागरिकांसाठी कायदेविषयक साक्षरता शिबीर

### शासन स्तरावरील विविध शासकीय योजनांची माहिती व प्रत्यक्ष लाभ



**■ठाणे। प्रतिनिधी,**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निदेर्शानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, ठाणे यांच्यातर्फे रविवार, दि. २२ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०:०० वाजता विद्या प्रसारक मंडळ यांचे धोरले बाजीराव पेशवे सभागृह व पीकलबॉल व बास्केटबॉल मैदान, ठाणे महाविद्यालय परिसर, चेंदणी रोड, सिडको बस स्टॉप समोर, ठाणे पश्चिम येथे नागरिकांकरिता कायदेविषयक साक्षरता शिबिराद्वारे विधी सेवा व सहाय्य तसेच शासन स्तरावरील विविध शासकीय योजनांची माहिती व प्रत्यक्ष लाभ देण्याकरीता एकाच छताखाली प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. श्रीनिवास अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली महाशिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

नागरिकांसाठी शासनाद्वारे वेळोवेळी अनेक प्रकारच्या योजना कार्यान्वीत केल्या जातात. परंतु सर्वच नागरिकांपर्यंत या योजना पोहोचतात असे दिसून येत नाही व त्यासाठीच या महाशिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे. या महाशिबिरामध्ये जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, महानगरपालिका, कामगार आयुक्तालय, तसेच सामाजिक क्षेत्रात विविध स्तरावर काम करणाऱ्या एन. जी.ओ. सहभाग घेणार आहेत.

या शिबीरात सर्व शासकीय विभागांमध्ये नागरिकांकरीता असलेल्या सर्व योजनांसाठी अंदाजे ३० ते ३५ स्वतंत्र स्टॉल व तज्ञांचे मार्गदर्शन देण्यात येणार असून सर्व योजना जनसामान्यांपर्यंत पोहोचविणे व त्या योजनांचा लाभ मिळवून देणे हा महाशिबिराचा उद्देश असून महाशिबिरासाठी सर्व नागरिकांना मोफत प्रवेश आहे.

तरी या सुवर्णसंधीचा लाभ घेण्याकरीता सर्व स्तरातील नागरिकांनी जास्तीत जारत संख्येने सामील होण्याचे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, ठाणे चे सचिव रविंद्र पाजणकर यांनी केले आहे.

## पुण्यात तरुणांच्या संशयास्पद हालचाली

### पोलिसांनी ताब्यात घेताच धक्कादायक खुलासा



**■विरार। प्रतिनिधी,**

पुण्यात एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला. पोलिस गस्तीवर असताना त्यांना दोन तरुणांच्या हालचाली संशयास्पद वाटल्या. या तरुणांवर पोलिसांनी लक्ष ठेवले आणि त्यानंतर जे काही पुढे आले ते हैराण करणारे होते. या दोन तरुणांनी तब्बल १० दुचाकी चोरल्या होत्या. या दुचाकी त्यांनी फक्त आणि फक्त मोज मजा करण्यासाठी चोरल्या. या दुचाकीचा वापर ते नशा करायला जाण्यासाठी करत.

हेच नाही तर एका विशिष्ट कंपनीच्याच दुचाकी हे चोर चोरी करत. त्यांना हव्या त्याच कंपनीच्या दुचाकीवर लक्ष ठेवत आणि योग्य संधी मिळताच त्याची चोरी करत. या दोन तरुणांना हा धंदा मागील काही महिन्यांपासून सुरू होता. अखेर पोलिसांनी त्यांना फक्त त्यांच्या हालचालीवरून ताब्यात घेतले आणि मोठा खुलासा झाला. पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने यांना ताब्यात घेतले.

पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या कर्मचाऱ्यांना २ तरुण एका दुचाकीवर बसले असून त्यांच्या हालचाली संशयास्पद असल्याचे दिसून आले. यानंतर त्यांनी या तरुणांकडे चौकशी केली असता त्यांच्याकडे असलेली ही दुचाकी चोरीची असल्याचे पुढे आले. अधिक चौकशी केली असता संपूर्ण प्रकार पोलिसांच्या पुढे आला. पवन तानाजी माने (वय २२) आणि प्रतिक शिवाजी अस्वरे (वय २०) असे अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.

या प्रकरणी आणखी २ जणांचा शोध सुरू आहे. हडपसर, दिघी, चंदननगर पोलिस ठाण्यात या आरोपींच्या विरोधात याआधी चोरीचे अनेक गुन्हे दाखल आहेत. पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने २ तरुणांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून तब्बल १० चोरीच्या दुचाकी ताब्यात घेतल्या आहेत. विशेष म्हणजे या १० पैकी काही गाड्या यामाहा कंपनीच्या आहेत. पोलिसांनी या दोघांकडे चौकशी केली.



## पॅन नियमांत मोठे बदल

### सामान्य करदात्यांवर थेट परिणाम

**■मुंबई। प्रतिनिधी,**

सरकारने Draft Income-tax Rules, २०२६ जाहीर केले असून, यामध्ये पॅन कार्डशी संबंधित काही महत्त्वाचे बदल सुचवण्यात आले आहेत. या मसुद्यावर सरकारने सर्व संबंधित भागधारकांकडून अभिप्राय मागवला आहे. या अभिप्रायासाठी २२ फेब्रुवारी २०२६ ही अंतिम तारीख आहे. अभिप्राय मिळाल्यानंतर सुधारित नियमांना मंजुरी देऊन सरकारकडून अधिकृत अधिसूचना जारी केली जाईल. हे नवीन नियम १ एप्रिल २०२६ पासून लागू होणार आहेत. Government of Indiaच्या या प्रस्तावित नियमांमुळे सामान्य करदात्यांवर थेट परिणाम होऊ शकतो. विशेषतः पॅन कार्डशी संबंधित बदलांमुळे कर भरणे, ओळख पडताळणी आणि आर्थिक व्यवहार अधिक सुलभ व पारदर्शक होण्याचा सरकारचा उद्देश आहे.

**१) रोख रक्कम जमा आणि काढणे** : सध्याच्या नियमांनुसार, एका दिवसात बँक किंवा पोस्ट ऑफिसमध्ये ५० हजार रुपयांपेक्षा जास्त रोख रक्कम जमा करताना पॅन आवश्यक असतो. तर हा नियम बदलून वर्षभरात (आर्थिक वर्षात) वेगवेगळ्या बँक खात्यांमधून एकूण १० लाख रुपये किंवा त्याहून अधिक रक्कम जमा केली तर पॅन आवश्यक ठरेल.

**२) वाहन खरेदी** : आतापर्यंत दुचाकी वगळता सर्व वाहनांच्या खरेदीसाठी पॅन देणे बंधनकारक होते. नव्या प्रस्तावानुसार, ५ लाख रुपयांपेक्षा जास्त किमतीचे वाहन किंवा दुचाकी खरेदी करतानाच पॅन आवश्यक असेल. यामुळे कमी किमतीच्या वाहन खरेदीदारांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

**३) हॉटेल आणि रेस्टॉरंटचे बिल** : सध्या हॉटेल किंवा रेस्टॉरंटमध्ये ५० हजार रुपयांपेक्षा जास्त बिल भरताना पॅन द्यावा लागतो. नवीन नियमांनुसार ही मयार्दा वाढवून १ लाख रुपये करण्याचा प्रस्ताव आहे. त्यामुळे मध्यम खर्चाच्या बिलांवर पॅन देण्याची गरज कमी होऊ शकते.

**४) स्थावर मालमत्तेचे व्यवहार** : आताच्या नियमांनुसार, १० लाख रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या स्थावर मालमत्तेच्या व्यवहारासाठी पॅन आवश्यक आहे. नव्या नियमांमध्ये ही मयार्दा वाढवून २० लाख रुपये करण्याचा प्रस्ताव आहे. यामुळे कमी किमतीच्या मालमत्ता व्यवहारांमध्ये सुलभता येण्याची अपेक्षा आहे.

**५) विमा पॉलिसी** : सध्याच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार विमा हप्ता ५० हजार रुपयांपेक्षा जास्त असल्यास पॅन कार्ड आवश्यक असते. मात्र नव्या प्रस्तावानुसार या नियमाची व्याप्ती मोठ्या प्रमाणात वाढवण्यात आली असून, विमा कंपन्यांशी असलेल्या सर्व खाते-आधारित व्यवहारांसाठी ढअठ देणे बंधनकारक करण्याचा विचार करण्यात आला आहे.

## स्थायी, शिक्षण, सुधार आणि बेस्ट समिती अध्यक्षपदाची निवडणूक बिनविरोध?

**■मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबई महापालिकेच्या शिक्षण, स्थायी, सुधार आणि बेस्ट समिती अध्यक्षपदासाठी बुधवारी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत असून या चारही समित्यांच्या अध्यक्षपदासाठी बुधवारी अर्ज भरले जाणार असल्याने भाजपा आणि शिवसेनेकडून उमेदवारी जाहिर होवून अध्यक्षपदाचे खरे चेहरे समोर येणार आहेत. दरम्यान, महापौर आणि उपमहापौरपदाची निवडणुकीत उमेदवार न देता उबाठाने ही निवडणूक बिनविरोध केल्यानंतर या चारही समित्यांमध्ये उबाठाकडून उमेदवार देण्याची शक्यता कमीच मानली जात आहे. त्यामुळे उबाठाने उमेदवार न दिल्यास ही निवडणूकही बिनविरोध होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

मुंबई महापालिकेच्या स्थायी समिती, शिक्षण समिती, अध्यक्षपदासाठी येत्या २० फेब्रुवारी रोजी निवडणूक होणार आहे, तर सुधार समिती आणि बेस्ट समिती अध्यक्षपदाची निवडणूक येत्या २३ फेब्रुवारी रोजी होणार आहे. या चारही समित्यांच्या अध्यक्षपदासाठी बुधवारी १८ फेब्रुवारी रोजी उमेदवारी अर्ज दाखल केले जात आहेत.

स्थायी समिती अध्यक्षपदासाठी भाजपकडून



प्रभाकर शिंदे यांचे नाव जवळजवळ अंतिम झाले आहे. तर शिक्षण समिती अध्यक्षपदासाठी राजेश्री शिरवडकर यांची नावही निश्चित झाल्याची माहिती मिळत आहे. तर सुधार समिती अध्यक्षपदासाठी शिवसेनेकडून अमेय घोले आणि बेस्ट समिती अध्यक्षपदासाठी तृष्णा विश्वासराव यांचीही नावे अंतिम झाली आहेत. परंतु विरोधी पक्षांकडून या चारही समित्यांवर सदस्यांची नियुक्ती झाली असली तरी त्यातील कुणाला उमेदवारी देण्यात येण्याची शक्यता कमीच मानली जात आहे. महापौर आणि उपमहापौरपदाच्या निवडणुकीत ज्या कारणांसाठी उबाठाने माघार घेत उमेदवार दिला नव्हता, तेच कारण आता चारही वैधानिक समिती अध्यक्षपदाच्या निवडणुकीत उबाठासमोर आहे. त्यामुळे चारही वैधानिक समित्यांच्या अध्यक्षपदासाठी उमेदवारी अर्ज न भरता ही निवडणूक बिनविरोध केली जाण्याचे बोलले जात आहे. त्यामुळे बुधवारी उबाठाकडून प्रत्यक्षात उमेदवार दिला जातो की महापौर निवडणुकीप्रमाणे बिनविरोध केली जाते याकडे सर्वांचे लक्ष आहे. विशेष म्हणजे सर्व समित्यांमध्ये सत्ताधार पक्षांचे संख्याबळ हे विरोधी पक्षाच्या सदस्यांच्या तुलनेत दोनने अधिक आहे.त्यामुळे निवडणूक कॉंटे की टक्कर नसल्याने उबाठाला प्रत्यक्षात मतदानाची भीती असून जर मनसे आणि समाजवादी पक्षाने पाठिंबा न दिल्यास किंवा कॉंग्रेस तटस्थ राहिल्यास आपला गेम होईल याची भीती वाटत आहे.

## विविध विकासकामांबाबत पालिकेत बैठक



**■विरार। प्रतिनिधी,**

वसई-विरार शहर महानगरपालिका महापौर परिषद दालनात सोमवारी १६ फेब्रुवारी रोजी शहरातील विविध विकासकामांचा आढावा घेण्यासाठी बैठक पार पडली. महापौर अजिव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक संपन्न झाली. शहरातील विकासकामांना गती देण्याच्या उद्देशाने बहुजन विकास आघाडीचे अध्यक्ष हितेंद्र ठाकुर तसेच माजी आमदार क्षितिज ठाकुर यांच्या नेतृत्वाखाली चर्चा करण्यात आली. सुरू असलेल्या तसेच प्रस्तावित कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. बैठकीस उपमहापौर मार्शल लोपिस, माजी खासदार बळीराम जाधव, माजी आमदार राजेश पाटील तसेच बहुजन विकास आघाडीचे आजी-माजी महापौर, उपमहापौर, पदाधिकारी आणि विद्यमान नगरसेवक उपस्थित होते. पालिकेचे आयुक्त मनोजकुमार सूर्यवंशी यांनी महापालिका क्षेत्रात सुरू असलेल्या विविध प्रकल्पांची माहिती दिली. प्रलंबित कामे लवकर पूर्ण करण्याबरोबरच नव्या विकासकामांना गती देण्यासाठी अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त, शहर अभियंता आणि संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक निर्देश देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. बैठकीबाबतची माहिती नगरसेवक हार्दिक राऊत यांनी दिली.

## मुलुंडचे आमदार मिहिर कोटेचा यांची मेट्रो लाईन ४ साठी थर्ड पार्टी ऑडिटची मागणी

**■मुंबई। प्रतिनिधी,**

शनिवारी झालेल्या पॅरापेट कोसळल्याच्या घटनेनंतर मेट्रो लाईन ४ च्या संरचनेच्या सुरक्षिततेबाबत नागरिकांमध्ये भीती वाढत आहे. त्या पार्श्वभूमीवर आज मुलुंडचे भाजप आमदार मिहिर कोटेचा यांनी बुधवारी एलबीएस रोडवरील मेट्रो लाईन ४ च्या पट्ट्याची संयुक्त पाहणी केली. या पाहणीला मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या टी-वार्डमधील अधिकारी उपस्थित होते.

संयुक्त पाहणीनंतर आमदार मिहिर कोटेचा यांनी संपूर्ण मेट्रो लाईन ४ मार्गिकेचे थर्ड पार्टी गुणवत्ता नियंत्रण व सुरक्षा ऑडिट करण्याची मागणी केली. संरचनेची सुरक्षितता अबाधित असली तरी त्रुटींसाठी जबाबदार असलेल्या कन्सल्टंट आणि ऑडिटर्स यांच्यावर कडक कारवाई करण्याची मागणी आमदार मिहिर कोटेचा यांनी केली.

बुधवारी करण्यात आलेल्या या संयुक्त पाहणीत मुलुंडमधील एलबीएस रोडवरील मेट्रो लाईन ४ च्या सात ते आठ ठिकाणांचा आढावा घेण्यात आला. एमएमआरडीएचे मुख्य अभियंता श्री. मधुकर खरात यांच्या नेतृत्वाखालील



पथक, टी-वार्ड अधिकारी योगिता कोळे व आपत्ती व्यवस्थापन पथक तसेच स्थानिक नगरसेविका डॉ. हेतल गाला मोरवेकर आणि दीपिका घाग उपस्थित होत्या.

शनिवारी झालेल्या पॅरापेट कोसळण्याच्या घटनेनंतर रहिवाशांकडून मेट्रो मार्गिकेवरील पॅरापेट भिंतींमध्ये अलाईनमेंटच्या समस्या, गॅप्स आणि लेव्हलमधील फरक दर्शविणारे फोटो पाठवले जात आहेत. सुमारे ५०० सारखे फोटो मला आणि टी-वार्ड आपत्ती व्यवस्थापन पथकाला नागरिकांनी पाठवले आहेत, असे आमदार मिहिर कोटेचा यांनी सांगितले.

अधिकाऱ्यांनी काही ठिकाणी किरकोळ तांत्रिक व फिनिशिंगमधील त्रुटी, विशेषतः पॅरापेट भिंतींच्या अलाईनमेंट संदर्भात, मान्य केल्या असल्याचे आमदार मिहिर कोटेचा यांनी सांगितले. मात्र, या त्रुटींमुळे संरचनेच्या सुरक्षिततेवर किंवा स्थैर्यावर कोणताही परिणाम झालेला नसून संरचना १०० टक्के सुरक्षित असल्याचा दावा अधिकाऱ्यांनी केल्याचे आमदार मिहिर कोटेचा यांनी नमूद केले.

मात्र, काही ठिकाणी आठ ते बारा महिन्यांपूर्वी बसवण्यात आलेल्या या संरचनेतील त्रुटी सल्लागार आणि ऑडिटर्सना त्यावेळी किंवा त्यानंतर का आढळल्या नाहीत? कास्टिंगनंतर त्यांनी या त्रुटींची दखल का घेतली नाही? असा सवाल आमदार मिहिर कोटेचा यांनी केला.

आमदार मिहिर कोटेचा पुढे म्हणाले की, मुंबई हे जागतिक शहर असून जगातील विकसित शहरांमधील मेट्रोची गुणवत्ता उच्च दजार्ची असते. महाराष्ट्र शासनाने करारानुसार कंत्राटदारांना पूर्ण देयके अदा केली आहेत. त्यामुळे संपूर्ण मेट्रो लाईन ४ मार्गिकेचे थर्ड पार्टी गुणवत्ता नियंत्रण व सुरक्षा ऑडिट करणे आवश्यक आहे. संरचनेची सुरक्षितता अबाधित असली तरी त्रुटींसाठी जबाबदार असलेल्या कन्सल्टंट आणि ऑडिटर्स यांच्यावर कडक कारवाई केली पाहिजे, अशी मागणी आमदार मिहिर कोटेचा यांनी केली.




संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# कचरा वर्गीकरण आणि शिस्त



मुंबईजवळील ठाणे महानगरपालिकेने शहराच्या कचरा व्यवस्थापनासाठी 'इन्सिरेशन' तंत्रज्ञान, म्हणजे कचरा जाळून नष्ट करण्याचे तंत्रज्ञान वापरून कचराभूमीवर न्यूनतम कचरा राहील, असा प्रकल्प विकसित केला आहे. या तंत्रज्ञान पद्धतीत कचरा उच्च तापमानावर जाळला जाऊन त्यातून निघणारा धूर आणि वायू शुद्ध केले जातात अन राखेची सुरक्षित विल्हेवाट लावली जाते. याचा लाभ असा आहे की, ७० ते ८० टक्के कचरा जाळला गेल्याने कचराभूमीचा वापर न्यून होतो, रोगजंतू पूर्ण नष्ट होतात आणि यातून ऊर्जानिर्मिती करता येते. यातून २४ मेगावॅट वीजनिर्मिती होण्याची अपेक्षा आहे. सध्या या प्रकल्पाचे दुष्परिणाम अल्प दिसत आहेत. 'कचऱ्यातून ऊर्जा' या नावाचा हा प्रकल्प राज्यातील सर्वांत मोठ्या प्रकल्पांपैकी एक आहे. हा खर्चिक प्रकल्प यशस्वी ठरला, तर पुढे इतरत्रही त्याचे अनुकरण केले जाऊ शकते; मात्र सध्यातरी विविध शहरांतील घनकचरा व्यवस्थापनाची स्थिती सुधारण्यास पुष्कळ मोठा वाव आहे. सध्या भारतात ३७ टक्के लोक शहरात रहातात. वर्ष २०३० पर्यंत हे प्रमाण ४० आणि वर्ष २०५० पर्यंत ५० टक्के होऊ शकते. प्रचंड लोकसंख्येमुळे शहरातील सर्व सुविधांप्रमाणेच सर्वात मोठा ताण येतो, तो कचरा व्यवस्थापनावर! शहरातील सर्व कचरा एकत्र करून एका ठराविक भूमीवर टाकण्यात येतो. महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाचे दायित्व शहरातील सर्व कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचे असले, तरी वाढत्या लोकसंख्येमुळे उपनगरांमध्ये 'कचराभूमी' ठिकठिकाणी निर्माण करावी लागत असल्याने आता विविध वाद वाढत चालले आहेत. मुंबईतील सर्वांत मोठ्या देवनारसारख्या 'डंपिंग ग्राऊंड' म्हणजे कचरा साठवण्याच्या जागेच्या आजूबाजूच्या २ कि.मी. परिसरात गेले, तरी असह्य घाण वास येणे चालू होते. मागील वर्षी प्रसिद्ध झालेल्या वृत्तानुसार मुंबईतील देवनार डंपिंग ग्राऊंडवर ४० मजले उंच एवढा कचरा साठल्याने ही जागा भारतातील सर्वोच्च प्रमाणात 'मिथेन' हा विषारी वायू उत्पन्न करणाऱ्या २२ जागांपैकी एक बनली आहे. प्रतिघंटा ६ सहस्र २०० किलो ज्वलनशील वायू येथून बाहेर पडतो, जो अत्यंत हानीकारक असल्याने येथील लोकांच्या आरोग्याच्या समस्या वाढल्या आहेत. मागील वर्षीपासून त्याचे 'बायोमायनिंग' (जैवउपचार) चालू करण्यात आले आहे. यात पूर्वापार चालत आलेल्या कचरा टाकण्याच्या भूमीतील सूक्ष्म कचऱ्याचे विभाजन आणि विघटन करून त्या जागा मोकळ्या केल्या जातात. तेथील तांत्रिक कचरा वेगळा करून दुसरीकडे नेला जातो आणि जैविक कचरा कुजवून भूमी सुपीक केली जाते. अशा प्रकारे देवनारची कचराभूमी मोकळी होण्यास ३ वर्षे तरी लागतील. असे प्रकल्प महाराष्ट्रात नागपूरसह ७ ठिकाणी राबवले जात आहेत. देशभरात ५५० हून अधिक ठिकाणी या प्रकारचे काम चालू असलेले पहाता या प्रगत राज्यातील आकडेवारीची ही संख्या अत्यल्पच म्हणावी लागेल. आपल्याकडे साधे ओल्या आणि सुक्या कचऱ्याच्या वर्गीकरणाचे सूत्र घेतले, तर अजूनही भारतातील बहुसंख्य जनता त्याचे विभाजनच करत नाही, असे लक्षात येते. देशभरात हे विभाजन होण्याचे प्रमाण २० टक्क्यांपासून ९० टक्क्यांपर्यंत एवढे विविधांगी आहे. कचऱ्याचे वर्गीकरण हा कचऱ्याच्या विघटनातील प्रथम टप्पा असतो; परंतु तेच भारतात काटेकोरपणे होत नाही. भारतात यासाठी कडक कायदे आणि उपाययोजना नाहीत; त्यामुळे नागरिकांना शिस्त नाही, असे दुर्दैवाने म्हणावे लागते. या देशातील जनतेने अमृतासमान पवित्र जल असणाऱ्या नद्यांचे स्वरूप त्यात सांडपाणी आणि रसायने मिसळवून अक्षरशः विषासमान केले आहे. तिथे भूमीवरील कचऱ्याविषयी काय बोलणार? भारतातही 'वापरा आणि फेका' विकृतीच्या झालेल्या उदयामुळे कचऱ्याचे प्रमाणही प्रचंड वाढले आहे. वस्तू गाडीतून किंवा रस्त्यात फेकतांना नागरिकांना जराही संकोच वाटत नाही. हे तमोगुणी समाजाचे लक्षण आहे. पूर्वीच्या काळी 'तंत्रज्ञान', 'प्लास्टिक' आणि 'बाहेर खाणे' हे विषय नसल्यामुळे देशात अर्धाअधिक घाण निर्माणच होत नसे. कचरा टाकण्याविषयीच्या जनतेच्या बेशिस्तीमुळेच मोदी शासन आल्यावर त्यांना प्रथम कचरा अभियान हातात घ्यावे लागले. मुंबईत खाऊ गल्ल्यांच्या बाहेर जमा होणारा प्रचंड कचरा कधी उचलला गेला नाही, तर उंदीर आणि प्लास्टिक गोळा करणारे तो सगळीकडे पसरवून ठेवतात. या कचऱ्यातून आज कित्येक जणांची पोटे भरतात, हेही भारताचे दुर्दैव आहे. 'भारतीय तंत्रज्ञान संस्था (आयआयटी), मुंबई'च्या पर्यावरण अभियांत्रिकी विभागाचे प्रा. डॉ. असोलेकर यांच्या मते मोठ्या आस्थापनांएवढी छोट्या गृहउद्योग बनवले जाणारे (केवळ विघटित घटक असलेले) 'सॅनिटरी 'पॅड' किंवा 'नॅपकीन' (मलमूत्र किंवा मासिक पाळी यांसाठी वापरले जाणारे प्लास्टिकसह बनवलेले गेलेले आच्छादन) वापरले, तर त्यांचे विघटन करणे शक्य आहे, अन्यथा ८०० वर्षे त्याचे विघटन होत नाही. ते पुरवणाऱ्या यंत्राची विज्ञापने केली जातात; पण विदेशात सर्वत्र असणाऱ्या त्याची विल्हेवाट लावणाऱ्या यंत्राविषयी कुणी काही बोलत नाही. वैद्यकीय कचरा देशात अयोग्य पद्धतीने टाकला गेल्याने तो संसर्गजन्य रोगास कारणीभूत ठरत आहे, तर वायर, भ्रमणभाष, भ्रमणसंगणक आदी तंत्रज्ञानाच्या कचऱ्यामुळे शिसे, पारा, कॅडियम हे विषारी पदार्थ वातावरणात मिसळत आहेत. मध्यंत्या काळात मुंबईत घाण करणाऱ्यांना दंड आकारणारे पालिका कर्मचारीच भ्रष्ट असल्याचे निष्पन्न झाल्याने ते (क्लिनअप मार्शल) पदच आता रहित करण्यात आले, अशी आपली स्थिती आहे. परदेशात ओला आणि सुका कचरा वेगळा केला नाही, तर मोठ्या प्रमाणात दंड आकारला जातो. जपानसारख्या देशात तर कचरा न (उचलण्याची) नेण्याचीच शिक्षा दिली जाते. भारतातही अशा प्रकारची कार्यवाही केल्यास लोकांना कचऱ्याचे व्यवस्थापन करण्याची शिस्त लागू शकते. घरापासून कचऱ्याचे व्यवस्थापन करण्याची शिस्त लागली, तर पुढे ती शहरातील कचरा समस्या अल्प होऊ शकते. नवीन इमारतींमध्ये सांडपाणी प्रकल्प असल्याविना त्यांना 'ना हरकत प्रमाणपत्र' (नो ऑब्जेक्शन सर्टिफिकेट) देऊ नये, असा आदेश याच मासात मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे. त्याची काटेकोर कार्यवाही झाली पाहिजे. स्वीडनसारखे देश पुनर्वापर केलेल्या घनकचऱ्याची निर्यात करून भरपूर डॉलर कमवतात. भारतातही पुनर्वापरासाठी प्रचंड मोठ्या प्रमाणावर टायर, प्लास्टिक हा नष्ट न होणारा कचरा आयात केला जातो; तो पूर्णपणे बंद झाला पाहिजे. शासनाच्या विविध उपाययोजनांना जनतेने मनापासून साथ दिली, तरच भारत पूर्वीसारखा स्वच्छ आणि सुंदर होईल!

# महाराज, आम्हांस क्षमा असावी!


**श्रीमानयोगी छत्रपती शिवाजी महाराज, आपल्या चरणी साष्टांग दंडवत. हे पत्र लिहिताना मनाला अतीव वेदना होतात. तुम्ही रक्त सांडून उभे केलेले हे स्वराज्य आम्ही मिरवणुकांच्या धिंगाण्यात गहाण टाकतो. तुमच्या तलवारीचे तेज आमच्या आत्म्याला झगझगत नाही, तुमच्या न्यायाचे धारिष्ट्य आमच्या कृतीत उतरले नाही. महाराज, आमच्या ढोंगी शिवभक्तीचा मुखवटा तुमच्या तेजस्वी दृष्टिक्षेपात भस्मसात होईल याची आम्हांस भीती वाटते. आम्ही पुन्हा पुन्हा तुम्हाला विसरतो, पुन्हा पुन्हा चुकतो. म्हणूनच महाराज, आम्हांस क्षमा असावी!**

महाराज, काळ बदलला तसे आम्हीही बदललो. तुमच्या स्वराज्यास लायक न राहिलो. तुम्ही उभारलेले स्वराज्य आमच्या स्वार्थासाठीच वापरू लागलो. महाराज, आपला वा आपल्या 'छाव्या'चा पराक्रम दर्शवणारा एखादा चित्रपट येतो तेव्हाच आमचा ऊर दाटून येतो. त्याच काळात आम्ही आपला जयघोष करतो. तीन तासांच्या खेळानंतर आम्ही धाय मोकलून रडतो.

त्यामुळे आता ही मंडळी महाराजांचे तत्त्व अंगीकारेल वगैरे खुळा समज कुणाचाही होऊ शकतो, पण यत्किंचितही तसे होत नाही. आम्ही आपणास आणि आपल्या छाव्यास पुन्हा विसरून जातो. म्हणून महाराज आम्हांस क्षमा असावी. महाराज, आज जिकडे तिकडे तुमची चित्रे दिसतात. विचार मात्र कुठेच नाही. शिवभक्त हा केवळ गजर करणारा आणि फड उभारणारा नव्हे, तर तुमच्या तत्त्वांवर चालणारा असायला हवा हे कुणाला उमजलेलेच नाही.

महाराज, आज तुमची जयंती मोठ्या जल्लोषात साजरी होतेय. ही जयंती नक्की कधी यावरही आम्ही लढत होतो. अखंड भारताला आपल्या कवेत घेण्याची ताकद असलेल्या या बापाची जयंती दोनदा साजरी केली तर बिघडले कुठे असते? पण तितकी समज, बुद्धी आमच्या माथ्यांमध्ये असायला हवी ना...

महाराज, तुम्ही स्वराज्यासाठी जीवाची पर्वा केली नाही. रणांगणात लढलात. कधी निजामशाहीशी, कधी आदिलशाहीशी, तर कधी मुघलांशी समोरासमोर उभे राहिलात, परंतु आम्ही लढाई सोडून केवळ निष्क्रियतेत रमलो. तुम्ही रयतेस पोटच्या पोराप्रमाणे जपलेत, त्यांच्या सुख-दुःखाची काळजी वाहिली अन् कोणत्याही स्थितीत त्यांच्यावर अन्याय होऊ दिला नाही, परंतु आजची अवस्था पाहिली असती तर तुमच्या काळजात कट्यार खुपसली गेल्यासारखे वाटले असते. महाराज, आज राज्यकर्ते स्वार्थाने ग्रासले आहेत.




त्यांस रयतेचे काही देणेघेणे उरले नाही. लोकांस न्याय मिळावा, त्यांस सुख लाभावे या गोष्टी क्षुद्र झाल्या आहेत. जो मोठा तोच खरा. जो श्रीमंत तोच सज्जन आणि जो राजकारणी तोच न्यायाचा ठेकेदार असे अवास्तव नवे नियम समाजात रूढ झाले आहेत.

महाराज, तुम्ही न्यायप्रिय होता, सत्याचे धारक होता. स्वराज्यात न्यायाचा डोलारा हा कुणाच्याही सत्तेच्या जोखडाखाली नव्हता, तो केवळ सत्याच्या मार्गानेच उभा होता. तुम्ही न्यायासाठी आप्तेष्टांशीही शिक्षा केलीत, गाढवावरून फिरविले; परंतु आजच्या काळी न्याय हा सत्ताधाऱ्यांच्या हातचे बाहुलेच बनले आहे.

न्याय मागणारे लेकरू जर निर्धन असेल, दुर्बळ असेल, तर त्याच्या हंबरड्यास उत्तर मिळत नाही आणि ज्या हातांस रक्त सांडायची सवय आहे, त्यांस मात्र राजाश्रय लाभतो. आज न्यायदानाच्या पद्धतीत 'एन्काऊंटर' नावाचे अनधिकृत हत्यार आले आहे. यांत केवळ संशयित नव्हे, तर संपूर्ण न्यायव्यवस्थाच मारली जाते.

महाराज, तुम्ही ज्या भगव्या ध्वजास मान दिला, ज्या ध्वजासाठी मावळ्यांनी रक्त सांडले, त्या ध्वजाची आज दयनीय अवस्था पाहून मन हेलावते. तुमच्या काळी हा ध्वज स्वाभिमान होता. तो मावळ्यांच्या सन्मानाचा साक्षी होता. तुम्ही गडावर जिथे हा ध्वज रोवला, तेथून अन्याय, अत्याचार कायमचे नष्ट झाले. मावळे त्या ध्वजासाठी हसत हसत रणांगणात गेले, मृत्यूला मिठी मारली, पण त्या ध्वजाची शान झुकू दिली नाही. आज मात्र महाराज, त्यास फक्त उत्सवापुरते उभे केले जाते आणि त्यानंतर विसरले जाते.

महाराज, आज स्वराज्याची अस्मिता केवळ प्रतिकांपुरती उरली आहे. जयघोष करणे, गडकोटांवर भगवे झेंडे लावणे, तुमच्या नावाने घोषणा देणे एवढेच आम्हांस ज्ञात आहे, परंतु त्या घोषणांमागील ऊर्जेस आम्ही हृदयाशी धरले काय? महाराज, स्वराज्याच्या ध्वजाखाली रणसंग्राम गाजवणाऱ्या पराक्रमी मावळ्यांचे आजचे रूप ते काय? महाराज, तुमचे वीर मावळे आज पंचतारांकित उपहारगृहांबाहेर सुरक्षा रक्षकांच्या वेशात उभे दिसतात.

विवाह मंडपाच्या प्रवेशद्वाराशी सजविलेले मावळे उभे करून धनिकांचे मनोरंजन केले जाते आणि जिजाऊंच्या वेशातील कन्यका त्या देखाव्यास शोभा वाढवण्यासाठी ठेवतात. महाराज, हा अपमान पाहून तुम्हांस संताप अनावर होईल. ज्या हातांनी शत्रूंचे बळी घेतले, तेच हात आज केवळ दारावर उभे राहण्यास उपयोगी पडत आहेत. ज्या वीरपत्नींनी मावळ्यांचे धैर्य वाढविले, त्या मातांचाच सन्मान आता केवळ देखाव्यासाठी होत आहे. हे पाहून मन विदीर्ण होते महाराज! आम्ही तुमचे वारस आहोत का? की केवळ तुमच्या नावाने आपली दुकाने चालविणारे स्वार्थी व्यापारी आहोत?

महाराज, तुम्ही घाम गाळून, रणधुमाळी खेळून, रक्त सांडून ज्या गडकोटांस उभे केले, त्या गडांचे आज आम्ही काय हाल करीत आहोत? आज आम्ही त्या गडांवर जाऊन जयघोष करतो, तिथे भगवे झेंडे लावतो, परंतु त्या गडांचे जतन करतो काय? जिथे तुमच्या मावळ्यांनी तलवारीच्या एका फटकाऱ्यात शत्रूची मुंडकी खाली केली, तिथेच आता काही महाभाग मद्याच्या बाटल्या रिकाम्या करतात.

एकेकाळी रणसंग्रामाने दुमदुमणार्या या पवित्र गडांवर आता विकृतीचा धिंगाणा चालतो. महाराज, गड म्हणजे केवळ दगड-माती नव्हती, ती स्वराज्याची अस्मिता होती. त्या भिंती तुमच्या पराक्रमाच्या साक्षीदार होत्या, पण आज त्या भिंतींवर अश्लील लिखाण केले जाते, प्रेमाची नावे कोरली जातात अन् या पवित्र स्थळांचा बाजार केला जातो. म्हणूनच महाराज, आम्हांस क्षमा असावी!

महाराज, तुम्ही स्त्रीस उच्च स्थान दिले. तिच्या रक्षणासाठी कठोर कायदे केले. स्वराज्यात परस्त्रीस मातेसमान मानले अन् कुठल्याही रणांगणावर विजय मिळविला तरी स्त्रीस स्पर्श न करण्याची आज्ञा दिली, परंतु महाराज, आम्ही मात्र तुमच्या त्या शिकवणीचा काळिमा फासला आहे. आज स्त्रियांस स्वराज्य असले तरी सुरक्षितता नाही. बलात्कार, छेडछाड, शारीरिक अन् मानसिक छळ या गोष्टी रोजच्या झाल्या आहेत. महाराज, परस्त्रीस मातेसमान मानणे दूर राहिले, पण आता स्वतःच्या घरातील स्त्रियाही राक्षसी वासना भोगत आहे. मुलीवर तिच्या पित्यानेच अत्याचार केला, भगिनीवर भावानेच लांच्छन दिले, अशा बातम्या वर्तमानपत्रांमध्ये प्रसिद्ध होतात.

महाराज, तुमच्या स्वराज्यात शेतकरी हा राज्याचा कणा होता. तुम्ही शेतकऱ्यांसाठी नवे कायदे केले, त्यांचे उत्पन्न वाढविण्यास सहाय्य केले, त्यांस करमाफी दिली. स्वराज्यात कुणीही उपाशी राहू नये म्हणून तुम्ही प्रत्येक कणसास किंमत मिळवून दिली. ज्यावेळी सरदार वा सैनिक शेतकऱ्यांस छळू लागले, त्यांच्या श्रमावर डल्ला मारू पाहिले, त्यावेळी तुम्ही त्यांस कठोर शिक्षा केल्या, परंतु महाराज, आजची स्थिती पाहिली असती तर तुमच्या तळपायाची आग मस्तकात पोहचली असती. गरीब शेतकऱ्यांवरील कर्ज वाढत आहे, त्यांचे पोट रिकामे आहे.

महाराज, तुम्ही कोणत्याही धर्माविरुद्ध नव्हता. मावळ्यांमध्ये हिंदूही होते, मुसलमानही होते, परंतु आज धर्माच्या नावावर भांडणे सुरू आहेत. जातीयवाद वाढला, समाज फुटला. तुम्ही माणुसकीचे राज्य उभारले, आम्ही ते जातीधर्मात विभागले. म्हणूनच आम्हांस क्षमा असावी, महाराज, आम्ही तुमच्या स्वराज्याचे शिलेदार होण्याऐवजी स्वार्थाच्या गर्तेत लोळण घेत आहोत. आम्ही तुमच्या विचारांचे पालन करण्याऐवजी ढोलताशांच्या गजरात स्वतःस धन्य समजू लागलो. आम्ही तुमच्या शौर्यगाथांचे पोवाडे गातो, पण त्यातील विचार अंगीकारण्याचे धाडस करीत नाही.

आम्ही तुमच्या नावाचा घोष करतो, पण तुमच्या नीतीचा विसर पडला. हाच तो आमुचा अपराध, हेच ते आमुचे लांच्छन! आम्ही तुमच्या विश्वासास पात्र ठरलो नाही! गद्दारीचा जुनाच शाप आहे महाराज. त्या काळाप्रमाणे सांप्रत काळातही गनीम बाहेर कमी आणि घरातच जास्त आहेत. हे गनीमच घात करतात. गनिमी काव्याने या घातकी गनिमांचा फडशा पाडू, तेव्हाच पुन्हा एकदा आपली स्वराज्याची पताका डौलाने फडकेल! तोपर्यंत महाराज, आम्हांस क्षमा असावी!

# शेतकऱ्यांना उद्ध्वस्त करणारा करार

भारत-अमेरिका व्यापार करार हा केवळ आर्थिक दस्तावेज नाही; तो ग्रामीण भारताच्या भविष्याशी जोडलेला आहे. शेतकऱ्यांना कायद्याने हमीभावाची गॅरंटी दिली जात नाही, तोपर्यंत हा करार गंभीर धोका मानला जाईल.



रत-अमेरिका व्यापार कराराच्या घोषणेनंतर केंद्र सरकारने त्याला 'ऐतिहासिक', 'रणनीतिक' आणि 'दोन्ही देशांसाठी फायदेशीर' असे विशेषण लावले. परंतु या कराराचा अधिकृत मजकूर अद्याप सार्वजनिक करण्यात आलेला नाही. संसदेला विश्वासात न घेता, शेतकरी संघटनांशी सखोल चर्चा न करता आणि कृषी क्षेत्रावरील संभाव्य परिणामांचे विश्लेषण उघड न करता कराराची घोषणा केली. प्रत्येक छोट्या गोष्टीचे प्रचंड मोठे इव्हेंट आणि मार्केटिंग करणारे सरकार या करारावाबत देशाला काहीच सांगत नाही. पंतप्रधान फक्त एक-दोन ओळींचे ट्वीट करतात. करारात नेमके काय आहे? याबद्दल पत्रकारांनी वाणिज्य मंत्र्यांना विचारले की, ते म्हणतात, परराष्ट्र मंत्र्यांना विचारा आणि परराष्ट्र मंत्री म्हणतात, मी या कराराचा भाग नाही, वाणिज्य मंत्र्यांना विचारा. पण अमेरिकेचे राष्ट्रपती आणि मंत्र्यांनी दिलेल्या माहितीनुसार हा करार अमेरिकन शेतकऱ्यांच्या फायद्याचा आहे. परिणामी, देशातील लाखो शेतकऱ्यांमध्ये संभ्रम, भीती आणि असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.

### भू-राजकारण आणि करारासाठी दबाव

सप्टेंबर २०२५ मध्ये अमेरिकेने भारतावर ५०% शुल्क (टॅरिफ) लादले त्यात रशियाकडून तेल खरेदीबद्दल अधिकच्या २५ टक्के दंडात्मक शुल्काचा समावेश होता. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आपण भारत-पाकिस्तान या दोन देशांमध्ये युद्धविराम घडवल्याचे पन्नासहून अधिकवेळा जाहीरपणे सांगून पंतप्रधान नरेंद्र मोदींची कोंडी केली. त्यानंतर प्रचंड वेगाने या कराराची घोषणा करण्यात आली. यातून असा प्रश्न उपस्थित होतो की, हा करार समसमान भागीदारीतून झाला की आंतरराष्ट्रीय दबावाखाली? ट्रम्प यांनी केलेल्या घोषणेनुसार भारताने स्वस्त रशियन तेलाची खरेदी बंद करून अमेरिकेच्या ताब्यातील व्हेनेझुएलातील तेल आयात करण्याचे मान्य केल्याने देशाचे मोठे आर्थिक नुकसान होणार आहे. याचा थेट परिणाम ऊर्जा खर्चावर होईल. डिझेल, वीज, खते यांचे दर वाढून त्याचा भार शेती उत्पादन खर्चावर आणि पर्यायाने शेतकऱ्यांवर पडेल.

### शुल्क कपात : असमतोल व्यवहार?

उपलब्ध माहितीनुसार, अमेरिकेने भारतावरील २५ टक्के शुल्क १८ टक्क्यांपर्यंत कमी केले. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी सुरू केलेल्या टॅरिफ वॉरपूर्वी अमेरिका भारतीय मालावर फक्त ३ टक्के शुल्क आकारत होता. करारामुळे जर भारताला १८ टक्के टॅरिफ द्यावे लागले म्हणजे निर्यातीवर १५ टक्के वाढीव शुल्क देण्याचा करार भारत सरकारने केला. यासोबतच अमेरिकन वस्तूंना भारतीय बाजारात विनाशुल्क आणि सवलतीच्या दरात सुलभ प्रवेश मिळणार आहे, मग हा समसमान करार कसा म्हणायचा? भारतीय शेतकरी आणि उत्पादकांना अजूनही अमेरिकन बाजारात सवलत मिळत नाही, पण अमेरिकन कृषी उत्पादकांना मात्र भारतीय बाजारपेठ खुली होत आहे ही विषमता फक्त चिंताजनकच नाही तर देशातील शेतकऱ्यांना उद्ध्वस्त करणारी आहे.

### DDGS आणि सोयाबीन : तेलबिया क्षेत्राला धक्का

करारानुसार अमेरिकेकडून प्रथिनयुक्त DDGS ची आयात सुलभ होऊ शकते. DDGS हे मका-आधारित इथेनॉलचे उपउत्पादन आहे आणि पशुखाद्यासाठी वापरले जाते. कुक्कुटपालन उद्योगाला स्वस्त खाद्य मिळू शकेल, पण देशातील पशुखाद्य उद्योग सोयाबीन तेलपेंड आणि तेलबिया प्रक्रिया उद्योगावर अस्तित्वाचे संकट उभे राहणार आहे.

गेल्या काही वर्षांपासून भारत तेलबिया उत्पादन वाढवण्याचा प्रयत्न करत आहे. केंद्र सरकारने वारंवार याबाबत सवलतीच्या प्रोत्साहनपर घोषणा केल्या आहेत, पण अमेरिकेतून आयात सुलभ झाल्यास सोयाबीन, मोहरी, शेंगदाणे या तेलबियांच्या किमती कोसळतील. परिणामी शेतकरी पीक पद्धती बदलतील व तेल आयात कमी करण्याचे भारताचे उद्दिष्ट धोक्यात येईल.

### दुग्ध क्षेत्रावर सावट

भारत हा जगातील सर्वात मोठा दूध उत्पादक देश आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेत दुग्ध व्यवसाय हा शेतकऱ्यांचा पूरक उत्पन्नाचा प्रमुख स्रोत आहे. गोकुळ, वारणा, अमूल यांसारख्या सहकारी दूध उत्पादक संस्थांमुळे ग्रामीण भागातील गरीब शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक संपन्नता आली. करारामुळे अमेरिकन दुग्ध उत्पादनांना भारतात प्रवेश मिळाला, तर स्वस्त आयातीमुळे स्थानिक उत्पादक अडचणीत सापडतील.

### कापूस उत्पादक शेतकरी आणि वस्त्रोद्योग संकटात

अमेरिकेने भारताच्या तयार कपड्यांवर १८ टक्के टॅरिफ लावले आहे, तर बांगलादेशला शून्य टक्के टॅरिफची सवलत देताना अमेरिकन कापूस आयातीची अट घातली. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी लोकसभेत हा मुद्दा उपस्थित केल्यावर 'तोच लाभ हवा असेल तर अमेरिकन कापूस आयात करा' असे उत्तर सरकारने दिले. हा पर्याय प्रत्यक्षात कोंडी निर्माण करणारा आहे. अमेरिकन कापूस आयात केल्यास देशांतर्गत कापूस उत्पादकांना फटका बसेल आणि आयात टाळल्यास १८ टक्के टॅरिफमुळे भारतीय वस्त्रोद्योग संकटात येईल. त्यातच बांगलादेशाने भारतातून कापूस आयात कमी करण्याचे संकेत दिल्याने गंभीर संकट निर्माण होऊ लागले आहे. सध्या भारतात कापूस आयातीवर ११ टक्के शुल्क असूनही शेतकऱ्यांना प्रतिक्विंटल पाच हजार रुपये जास्त दर मिळत नाही; शुल्कमुक्त किंवा सवलतीच्या आयातीमुळे देशांतर्गत किमती आणखी ढासळतील.

### ५०० अब्ज डॉलर आयातीचे महासंकट

करारानंतर अमेरिकन सरकारच्या पत्रकार परिषदेत दिलेल्या माहितीनुसार, भारत ५०० अब्ज डॉलर मूल्याच्या अमेरिकन वस्तू खरेदी करेल. सध्या भारताची अमेरिकेकडून केली जाणारी आयात सुमारे ४५ अब्ज डॉलरच्या आसपास आहे. त्याच्या जवळपास दहापट वाढ म्हणजे भारतीय बाजारपेठेत अमेरिकन उत्पादनांची त्सुनामी येईल. यामुळे देशांतर्गत उत्पादन क्षेत्रावर प्रचंड दबाव येईल. टरटए क्षेत्राला मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. आयात वाढली आणि त्याच प्रमाणात निर्यात वाढली नाही, तर व्यापारी तूट लक्षणीय वाढेल आणि परकीय चलन संतुलनासह एकूण आर्थिक स्थैर्य बिघडण्याचा धोका निर्माण होऊ शकतो.

### शेतकरी आणि ग्रामीण अर्थव्यवस्था

भारतीय शेतीआधीच प्रचंड प्रमाणात वाढलेला उत्पादन खर्च, हवामान बदलाचे संकट, कर्जबाजारीपणा आणि बाजारातील अस्थिरतेने ग्रस्त आहे. अशा वेळी आयातमुक्तीचा धक्का बसल्यास ग्रामीण उत्पन्न घटेल. ग्रामीण खरेदी शक्ती कमी झाली तर त्याचा परिणाम संपूर्ण अर्थव्यवस्थेवर होईल.

### करार नाही संकट

भारत-अमेरिका व्यापार करार हा केवळ आर्थिक दस्तावेज नाही; तो ग्रामीण भारताच्या भविष्याशी जोडलेला आहे. अमेरिकेने करारानुसार टॅरिफमध्ये दिलेली छोटीशी सवलत ही अटी-शर्तींच्या अधिन आहे. अमेरिकन सरकार भारताच्या तेल खरेदीवर पाळत ठेवणार आहे. भारताने जर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे रशियन तेल खरेदी केले, तर पुन्हा दंडात्मक टॅरिफ लावण्याचा इशारा व्हाइट हाऊसच्या प्रसिद्धीपत्रकात दिलेला आहे. त्यामुळे जोपर्यंत करारातील सर्व तपशील सार्वजनिक होत नाहीत, शेतकऱ्यांना कायद्याने हमीभावाची गॅरंटी दिली जात नाही, संवेदनशील पिकांचे संरक्षण सुनिश्चित होत नाही, संसदेत सखोल चर्चा होत नाही, तोपर्यंत हा करार भारतीय शेतकऱ्यांसाठी गंभीर धोका मानला जाईल. शेतकऱ्यांच्या घामावर उभी असलेली अर्थव्यवस्था जर आंतरराष्ट्रीय दबावाखाली तडजोडी करत असेल, तर त्याची किंमत केवळ शेतकरी नव्हे तर संपूर्ण देशाला चुकवावी लागेल.


# छत्रपती शिवाजी महाराजः रयतेचा राजा आणि स्वराज्याचा शिल्पकार

१९ फेब्रुवारी हा दिवस प्रत्येक महाराष्ट्रीयन आणि भारतीयासाठी आनंदाचा, उत्साहाचा आणि अभिमानाचा सोहळा असतो. 'रयतेचा राजा' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांची ही जयंती केवळ एक सण नसून, तो स्वाभिमान जागवण्याचा दिवस आहे. पुणे जिल्ह्यातील शिवनेरी किल्ल्यावर सन १६३० मध्ये जिजाऊंच्या पोटी शिवरायांचा जन्म झाला. राजमाता जिजाऊंनी शिवबांवर रामायण-महाभारतातील कथांच्या माध्यमातून उत्तम संस्कार केले. अन्यायाविरुद्ध लढण्याची जिद्द त्यांच्यात बालपणीच निर्माण झाली. वयाच्या अवघ्या १५ व्या वर्षी रायरेश्वराच्या मंदिरात आपल्या सवंगड्यांसह त्यांनी 'हिंदवी स्वराज्याची' प्रतिज्ञा केली आणि गुलामगिरीच्या साखळदंडात अडकलेल्या महाराष्ट्राला मुक्त करण्याचे कार्य हाती घेतले. छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ एक योद्धे नव्हते, तर ते एक दूरदृष्टी असलेले उत्तम प्रशासक होते. त्यांनी स्वराज्याच्या कारभारासाठी 'अष्टप्रधान मंडळाची' स्थापना केली. शिवरायांचे दुर्गनीतीवर विशेष प्रेम होते, म्हणूनच त्यांनी स्वराज्यात ३०० हून अधिक किल्ले बांधले आणि दुरुस्त केले. त्यांनी ओळखले होते की, "ज्याचा आरमार, त्याचा समुद्र." म्हणून भारताच्या समुद्री सीमा सुरक्षित करण्यासाठी त्यांनी 'आरमार' उभे केले. म्हणूनच त्यांना 'भारतीय आरमाराचे जनक' मानले जाते. 'गनिमी कावा' हे त्यांच्या युद्धतंत्राचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य होते, ज्याद्वारे कमी सैन्यातही त्यांनी बलाढ्य शत्रूंना धूळ चारली. महाराजांच्या मनात सामान्य जनतेबद्दल (रयतेबद्दल) अपार माया होती. त्यांचा शासनकाळ हा खऱ्या अर्थाने 'लोककल्याणकारी' होता. शेतकऱ्यांचे रक्षणः "शेतकऱ्यांच्या भाजीच्या देठालाही हात लावू नका," अशी कडक आज्ञा त्यांनी आपल्या सैनिकांना दिली होती. दुष्काळात शेतकऱ्यांचा शेतसारा माफ करणारे ते पहिले राजे होते. स्त्रियांचा सन्मानः स्वराज्यात स्त्रियांचा अवमान करणाऱ्या कठोर शासन केले जाई. शत्रू पक्षाच्या स्त्रियांनाही आदर राखण्याची शिकवण त्यांनी सैन्याला दिली होती. कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेला दिलेला सन्मान हे याचे जिवंत उदाहरण आहे. न्यायप्रियताः स्वराज्यात जात-पात आणि धर्मापेक्षा कर्तृत्वाला महत्त्व दिले जाई. महाराजांच्या सैन्यात सर्व धर्मांचे लोक इमानदारीने सेवा करत असत. छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ इतिहासातील एक नाव नसून, ते आजही कोट्यवधी लोकांसाठी प्रेरणास्थान आहेत. त्यांनी शिकवलेला स्वाभिमान, साहस आणि नीतिमत्ता आजही आपल्याला प्रेरणा देते. आज त्यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या विचारांचे पाईक होण्याचा संकल्प करूया.

- स्वरुप रोहिणी चाया हुले, अलिबाग

## महाराष्ट्राचे आराध्य दैवत

# छत्रपती शिवाजी महाराज



**महाभाग्यवान मी...महाराष्ट्र माझी मायभूमी...महाराजांचीच ही महतकरणी! शुक्रवारचा दिवस होता, रात्रीची वेळ होती.अवघ्या शिवनेरीच्या मुखावर औत्सुक्य, आनंद अन् काळजी झळकत होती. साऱ्या गडाचे लक्ष लागले होते... ते जिजाऊंकडे. शिवनेरीत बांधलेला पाळणा मोठ्या प्रतिक्षेत होता. क्षणातच आनंद उधळीत एक बातमी चोही दिशेला वाऱ्यासारखी पसरली. पुत्ररत्न झाला.. पुत्ररत्न झाला! गडावरील सारं वातावरण ढवळून निघालं होतं. गडावर सर्वत्र नागरे-चौघडे वाजू लागले होते. चोहीकडून एकच वार्ता कानावर पडत होती. जिजाऊंच्या उदरी पुत्ररत्न झाला... अर्थातच शिवबाचा जन्म झाला अन् जणू काय भारत मातेच्या रक्षणार्थ.. हिंदवी स्वराज्याचा क्रांतीसूर्यच उदयास आला. ह्या शुभ बातमीच्या प्रित्यर्थ रयतेचं तोंड गोड करण्यासाठी सर्वत्र साखरेचं वाटप झालं. लोकांच्या चेहऱ्यावर आनंदाची झलक ठळकपणे दिसत होती. मांसाहेब जिजाऊंच्या मुखावर सोन्यावानी चमक झळकत होती. खरं तर, त्यांचा आनंद गगनात मावत नव्हता. त्यांना आकाशही ठेंगणं वाटत होतं. तो भाग्यवान दिवस म्हणजे १९ फेब्रुवारी.**

चला तर, शिवजयंतीनिमित्त आपण सर्वधर्मीय लोक शिवछत्रपतींच्या शौर्यगाथेला त्रिवार मानाचा मुजरा करूया अन् त्याबरोबरच शिव जयंती मोठ्या हर्षोल्हासात साजरी करूया! बोला...छत्रपती शिवाजी महाराजांचा विजय असो! जय भवानी! जय शिवछत्रपती!

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या कल्याण नगरीला महाराजांनी भारतातल्या पहिल्या आरमाराची स्थापना करण्याचा मान दिला. शत्रू पक्षाला गाफील ठेऊन गनिमी काव्याच्या युद्धतंत्राद्वारे शिवबाचे सैनिक कल्याण खाडीतून आपल्या आरमाराद्वारे हल्ले करायचे. केवळ भारतातल्या अंतर्गत शत्रूंनाच नव्हे तर, डच, पोर्तुगाल, इंग्रज, मोगल आदींना सुद्धा शिवछत्रपतींच्या आरमार यंत्रणेने जेरीस आणले होते.हिंदुस्थानाच्या इतिहासात सागरी बळाची उपयुक्तता व ताकद ओळखली ती शिवरायांनी. त्यांनी भारतीय आरमाराची या देशात सर्वप्रथम उभारणी केली. त्यामुळे शिवछत्रपतींना हिंदुस्थानी आरमाराचे (इंडियन नेव्ही) आद्यप्रणेते म्हणतात. महाराजांच्या जंगी बेड्यात सुमारे ७४ गलबते होती. अर्थातच शिवकालीन काळात महाराजांच्या आरमार दलाचा सर्वदूर दबदबा होता. दरम्यान दिपावलीच्या शुभमुहूर्तावर म्हणजेच २४ ऑक्टोबर १६५७ रोजी शिवरायांनी कल्याणला स्वतंत्र करून दुर्गाडीवर आपल्या हिंदुत्वाचा भगवा फडकवला. मराठी स्वराज्याची मुहूर्तमेढ कल्याणहून करत शिवरायांनी पुढे युद्धकौशल्याच्या बळावर सलग ४० किल्ले सर केलेत. राष्ट्रभक्तीसह हिंदुत्वाची भावना रयतेच्या मनात बिंबविण्याच्या दृष्टिकोनातून शिवबाने जिजाऊंच्या संकल्पनेतून दुर्गाडी किल्ल्यावर भवानीदेवीची प्रतिष्ठापना केली. यास्तव आम्ही कल्याणकर मांसाहेब जिजाऊ अन् शिवरायांचे ऋणाईत होऊन त्यांना त्रिवार नमन करतो.

मित्रहो, १६७४ साल उजाडलं अन् मराठी राज्याच्या इतिहासात एक नवं पर्व सुरू झालं. दरम्यानच्या काळात शिवराज्याभिषेक संदर्भात स्वकियांनी आणि परक्यांनी अनेक वेळा अडथळे आणलेत. त्यामुळे जिजामाता अत्यंत व्यथित झाल्या होत्या. त्या नेहमी शिवबाच्या राज्याभिषेकबाबत चिंतित असायच्या. शेवटी जिजामातांच्या अथक प्रयत्नांना यश आलं. काशीच्या गागाभट्टांना शिवबाच्या राज्याभिषेकचं पौरोहित्य सोपविण्यात आलं. या कारणास्तव रायगड नटूनथटून उभा होता. जिजाऊंच्या आनंदाला पारावारच उरला नव्हता. हा अभूतपूर्व सोहळा पाहण्यासाठी रायगडावर मोठी गर्दी उसळली होती. रायगडाच्या प्रवेशद्वारावर देशी व परदेशी पाहुण्यांच्या स्वागतासाठी खरेखुरे गजराज उभे ठाकले होते. ६ जून १६७४ रोजी पहाटे पाचच्या सुमारास शिवबाचा राज्यारोहण सोहळा संपन्न झाला. तोफांच्या सलामीनं अन् तुतारींच्या निनादात किल्ले रायगडावरील वातावरण ढवळून निघालं होतं. याप्रसंगी शिवरायांच्या नावाचा सर्वत्र जयघोष होत होता. गुलालाची उधळण होऊन किल्ल्याचा सारा परिसर भगवामय होऊन आनंदाने बहरून गेला होता. राज्याभिषेक झाल्यावर शिवाजी महाराजांच्या नावापुढे छत्रपती अश्या एका अर्थानं नामकरण झालं. जिजाऊंच्या डोळ्यांचे पारणं फिटलं. जीवनाचं अखेरचं स्वप्न साकार झाल्याने त्यांच्या चेहऱ्यावरील काळजी जणू एकाएक नाहिशी झाली होती. त्या तृप्त झाल्या. त्या धन्य झाल्या. त्यांना 'ह्याची देही ह्याची डोळा' शिवबाचा राज्याभिषेक पहावयास मिळाला.

राज्याभिषेक झाल्यानंतर शिवबा हे सिंहासनावर विराजमान झाले. त्या आधी त्यांनी गागाभट्ट आणि जिजाऊ मातेचं चरणस्पर्श करून आशिर्वाद घेतले. जिजाऊ ह्या शिवछत्रपतींची दृष्ट काढत म्हणाल्या शिवबा तुम्ही राजा झालात, रयतेचे राजा झालात. महत्वाचे म्हणजे तुम्ही छत्रपती झालात. आता तुम्ही आदर्श राजा होऊन पृथ्वीवर किर्तीमान व्हा. शिवबाचा राज्याभिषेक व्हावा, यासाठी जिजाऊंनी आपला जीव जणू मुठीत घट्ट धरून ठेवला होता. कारण हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेसाठी शिवबाला छत्रपती केल्यावर अवघ्या आठवड्यातच त्यांना देवाज्ञा झाली. धन्य त्या जिजाऊ मांसाहेब! आम्ही मराठी भूमिपुत्र वंदनीय जिजाऊ माँसाहेबांना त्रिवार मानाचा मुजरा करतो.

शिवबा हे मातृभक्त होते. ते मातेची आज्ञा शिरसावंद्य मानत असत. शिवबांचे पिताश्री शहाजीराजे हे आदिलशहाच्या दरबारी मोठे सरदार होते. परिणामी मराठा राज्याची संपूर्ण धुरा जिजाऊ माँसाहेबाच्या खांद्यांवर आली होती. दरम्यान जिजाऊंनी शिवबाला युद्धतंत्राचे परिपूर्ण प्रशिक्षण देऊन पारंगत केलं.शिवबाला आदर्श राजा बनविण्याचा जिजाऊंचा मानस होता. त्या पार्श्वभूमीवर त्यांना राज्यकारभाराचे बारकावे ज्ञात करून देण्यात आले होते. शिवबाची मातृभक्ती अपरंपार होती, तर जिजाऊंचे पुत्रप्रेम अटूट होतं.

शिवबा हे मातेच्या आज्ञेप्रमाणे राज्यकारभार करत असत. विशेष म्हणजे ते मातेच्या आज्ञा शिरसावंद्य मानत असत. एके दिवशी मांसाहेबांनी मला कोंढाणा हवा आहे, अशी इच्छा व्यक्त केली असता, शिवरायांनी लगेच आपले शूरवीर विश्वासू सरदार तानाजी मालुसरे यांना कोंढाणाच्या दिशेने कूच करण्याचा फर्मान सोडला.त्याच दिवशी नेमका त्यांच्या मुलाचा लग्नसोहळा होता. तरी देखील तानाजींनी शिवबाची आज्ञा शिरसावंद्य मानून कोंढाण्यावर स्वारी करून तो सर केला. परंतु तानाजी धारातिर्थी पडले. त्यामुळेच शिवकालीन इतिहासात 'गड आला पण सिंह गेला' हे सुवर्णाक्षरात लिहिले गेले. इतकेच नव्हे तर, जिजाऊंच्या प्रेरणेतून शिवबा अन् त्यांच्या शुरवीर मावळ्यांनी स्वराज्य स्थापनेची आई जगदंबेसमोर शपथ घेतली. शिवाजी महाराजांचे सुपुत्र राजे संभाजी महाराजांनी स्वकियांची बंडाळी मोडीस काढून शंभरहून अधिक युद्धे जिंकली. या पार्श्वभूमीवरच शिवकालीन इतिहासाचा 'शिवशंभु कालखंड' असा उल्लेख केला जातो.

शिवबा हे परस्त्रीला मातेसमान मानत असत. स्त्री मग ती आपल्या राज्यातली असो वा परक्या मुलखातली, ती मातेसमानच असते, ही शिकवण शिवबांनी सैनिकांसह रयतेलाही दिली. कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेला युद्धकैदी म्हणून ताब्यात घेतले असता, ही कृती महाराजांना अजिबात आवडली नाही. त्यांनी त्या परस्त्रीला मातेप्रमाणे आदरतिथ्य करून तिला तिच्या राज्यात सन्मानाने पोहोचविले. या घटनेला शिवकालीन इतिहास साक्षीदार आहे. अशीच एक अप्रिय घटना घडली की, एका गावप्रमुखाने स्त्रीच्या अब्रूची हेळसांड केली. हे कळल्यावर त्या दोषी व्यक्तीचे हातपाय तोडण्याची शिक्षा देण्याचा महाराजांनी फर्मान काढला. हे सर्व मांसाहेब जिजाऊंच्या संस्कारांचे फलित होते. शिवबा हे खऱ्या अर्थानं स्त्री स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते. स्त्रीयांना स्वरक्षण करता यावे, या उद्देशाने शिवरायांनी आपल्या राज्यातील महिलांना तलवारबाजीचे प्रशिक्षण देण्याची सोय केली होती. तात्पर्य, शिवरायांना स्त्रीयांबद्दल नितांत आदरभाव होता. वास्तवात शिवकालिन काळात स्त्रीला देव्हाऱ्यातली देवता मानायचे.

शिवबा हे शेतकऱ्यांचे हितचिंतक होते. शेतकरी हा देशाचा अन्नदाता आहे, हा विचार त्यांनी रयतेला दिला. शिवरायांच्या उच्च सैनिकांत सर्वाधिक शेतकऱ्यांची मुलं होती, हे जाणून त्यांनी शेतकऱ्यांचे हित जपण्यास नेहमी प्राधान्य दिलं.शेतकऱ्यांना कृषी क्षेत्रात बळीराजाला प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने, सर्वाधिक उत्पन्न काढणाऱ्या शेतकऱ्यांना पुरस्कार देऊन ते गौरवित असत. तर अल्पभूधारक शेतकऱ्यांना शिवकाळात मोफत बी-बियाणे पुरविली जायची. तसेच शेतसारा किफायतशीर प्रमाणात आकारला जायचा. पडिक जमिनीची मशागत करणाऱ्या शेतकऱ्यांना राज्याकडून अर्थसहाय्य दिलं जायचं. दुष्काळग्रस्त परिस्थितीत शेतकऱ्यांना शेतसारा माफ केला जात असे. वृक्ष तोड करू नये, असे कडक आदेश शिवरायांनी राज्यात काढले होते. शिवबा हे पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करण्यास अग्रक्रम देत असत. शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारली तर, राज्याला संपन्नता येईल, असे त्यांचे ठाम मत होते. शेतकऱ्याच्या पिकाच्या देठाला सुद्धा हात लावायचा नाही, असं सक्त फर्मान त्यांनी काढलं होते. शेती हा हिंदवी स्वराज्याचा पायाभूत उद्योग असल्यानं, युद्धकाळात उभ्या पिकांची नासाडी करणे, हा दंडनीय अपराध मानला जायचा. ह्या सर्व गोष्टी पाहिल्यावर शिव छत्रपती हे शेतकऱ्यांचे कैवारी होते, हे दृष्टोत्पत्तीस येते.

मोगल बादशहांच्या तुलनेने सैन्यदल व युद्धसामग्री कमी असूनही शिवछत्रपतींनी गनिमी कावा युद्धतंत्राचा अचूक प्रयोग करून शत्रूपक्षांना नामोहरम केलं.वास्तवात शिवरायांचे युद्धनैपुण्य अद्वितीय होतं. अफजलखानाचा वध, सुरतेची लूट, आग्र्याच्या नजरकैदेतून शिताफीने केलेली सुटका, शाहिस्तेखानवर हल्ला करत त्याच्या हाताची बोटं छाटणं, कोंढाण्याचा विजय या सर्व ऐतिहासिक घटनांमधील यश हे शिवबाच्या गनिमी कावाचे फलित होतं. त्यामुळेच आजही महापराक्रमी राजा म्हणून रयतेच्या मनावर त्यांचे अधिराज्य आहे

राज्याची मदार ही गडकिल्ल्यांवर आहे, हे जाणून शिवछत्रपतींनी राजगड, शिवनेर, पुरंदर, पन्हाळा, सिंहगड, विशालगड, प्रतापगड आदी किल्ले, कोट, जंजिरे उभारून राज्याची तटबंदी मजबूत केली. शिवकालीन राज्यव्यवस्था अत्यंत शिस्तबद्ध होती. राज्यकारभार पारदर्शक व गतिशील व्हावा, यासाठी शिवरायांनी अष्टप्रधान मंडळ नेमले होते. शिवकालीन नोकऱ्या अन् सैन्यभरती ही जाती-धर्मावर आधारित नव्हे तर, वैयक्तिक गुणवत्ता व युद्धनैपुण्यावर होत असे. राजाप्रती सरदार व सैनिकांची अपार निष्ठा तर, शिवबाचा त्यांच्यावरील दृढविश्वास असं एकमेकात अटूट बंध होतं. सैन्यदलात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या सरदार अन् सैनिकांना शिवबाच्या हस्ते बक्षिसे व उच्च पदे बहाल केली जात असत. यामुळेच शिवरायांची कुशल प्रशासक म्हणून रयतेत ख्याती होती. आजही त्यांचा आदर्श घेऊन महाराष्ट्राचा राज्यकारभार हाकला जात आहे, याचा आम्हा मराठी जनमानसाला सार्थ अभिमान आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांची यंदा ३९५ वी जयंती साजरी होत आहे. शिव जयंती दिनानिमित्त शिवनेरी किल्ल्यासह राज्यभर वाजतगाजत, गुलाल उधळत ढोलताशांच्या निनादात छत्रपतींचा जयंती महोत्सव साजरा होणारच, हे त्रिकाल सत्य आहे.

मित्रहो, शिवरायांचा राज्याभिषेक रायगड किल्ल्यावर झाला अन् ते छत्रपती झाले. या किल्ल्यावरील शिव छत्रपतींच्या भव्यदिव्य पुतळ्याला अन् अन्य पवित्र देवस्थळांना कल्याणचे खासदार डॉ.श्रीकांतजी शिंदे यांच्या संकल्पनेतून अखंड पुष्पहार सेवा हा नाविन्यपूर्ण व अद्वितीय उपक्रम गेल्या ५ वर्षांपासून अविरत चालू आहे. सदर उपक्रमाला मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांची प्रेरणा आहेच. या नाविन्यपूर्ण उपक्रमाबद्दल शिवाजी महाराजांचे वंशज छत्रपती संभाजीराजे भोसले यांनी मुक्तकंठाने प्रशंसा केली. या उपक्रमाचे नियोजन डॉ. श्रीकांत शिंदे फाउंडेशन, मुख्यमंत्र्याचे विशेष कार्यकारी अधिकारी मंगेश चिवटेसर आणि सोलापूर जिल्ह्यातील करमाळा येथील चिवटे बंधूंचे मुक्ताई गारमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने तनमनधनानं केलं जात आहे. ही गोष्ट शिवरायांचे ऐतिहासिक वैभव वृद्धिंगत करणारी असून, महाराष्ट्राच्या दृष्टीने खचितच गौरवास्पद आहे. वास्तवात शिवजयंतीनिमित्त हीच छत्रपती शिवाजी महाराजांना खरी आदरांजली आहे. चला तर, आपण सकल मराठी भूमिपुत्र वंदनीय शिवछत्रपतींना त्रिवार मानाचा मुजरा करूया।।

जय महाराष्ट्र!



## महसूल संरचना

- ४८,०७२.५७ कोटींच्या अपेक्षित आर्थिक उत्पन्नात पुढील घटकांचा समावेश:
  - जमीन विक्री - ११,१७७.९५ कोटी
  - अर्बन ट्रान्सपोर्ट फंड - ६,३६८.४२ कोटी
  - कर्जउभारणी - २३,७११.१६ कोटी
  - राज्य अधिनस्थ कर्जे - ३,५२०.०० कोटी
  - प्रकल्प संचालनातून मिळणारा महसूल - ४४१.७१ कोटी
  - शासकीय अनुदाने आणि टीडीआर - १,१८९.१४ कोटी
  - भूभाडे आणि व्याज उत्पन्न - १,६६४.१९ कोटी

**महान नेत्यांच्या स्मारकांची उभारणी**
- इंदू मिल येथील भारतरत्न
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर भव्य स्माक - ४००.०० कोटी
- स्व. बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारक (भाग १ व २), महापौर निवास, मुंबई - १७१.५० कोटी
- एकूण तरतूद - ५७१.५० कोटी

**हरित एमएमआर : हवामान बदल सक्षम भविष्य**

मुख्य भर :
- ब्ल्यू-ग्रीन पायाभूत सुविधा
- एकात्मिक कचरा व्यवस्थापन
- नवीकरणीय ऊर्जेचा समावेश
- शाश्वत दळणवळण
- मुंबई क्लायमेट वीक
- एकूण तरतूद - २५०.०० कोटी

**झोपडपट्टी पुनर्वसन आणि गृहनिर्माण**
- माता रमाबाई आंबेडकर नगर एसआरए - ५५१.०० कोटी
- पुनर्वसन व पुनर्स्थापना - १५०.०० कोटी
- परवडणारी भाडेतत्त्वावरील घरे - ३०.३३ कोटी
- एकूण - ७३१.३३ कोटी

**भुयारी दळणवळण मार्ग**

शहराच्या मध्यवर्ती भागावरील वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी आणि शहरांतर्गत प्रवास अधिक जलद करण्यासाठी एमएमआरडीएकडून उच्च क्षमतेच्या भुयारी दळणवळण पायाभूत सुविधांचा विस्तार करण्यात येत आहे.
- ऑरेंज गेट ते मरीन ड्राइव्ह कोस्टल रोड भुयारी मार्ग - १,२५०.००
- गायमुख ते फाऊंटन हॉटेल भुयारी मार्ग - ७५.००
- ठाणे ते बोरिवली चार पदरी भुयारी मार्ग - ३,०२९.५१
- मुंबई इंटिग्रेटेड टनेल - (बीडब्ल्यूएसएल-बीकेसी-एचएसआर-टी२ जोडणी) - १,१८९.००
- एकूण - ५,५४३.५१ तरतूद (कोटींमध्ये)

**मुख्य वाहतूक मार्गांची जोडणी आणि मल्टि- रिंग रोड नेटवर्क**
- अटल सेतू ते मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग जोडणी - ६०३.००
- आनंद नगर ते साकेत उन्नत मार्ग - ८८०.१२
- ठाणे कोस्टल रोड (बाळकुम-गायमुख) - १,०२५.७७
- फाऊंटन हॉटेल ते भाईंदर उन्नत मार्ग - ७५.००
- कल्याण रिंग रोड - ६००.००
- वरळी-शिवडी उन्नत कॉरिडॉर - ९३६.०७
- विस्तारित मुंबई शहरी पायाभूत सुविधा प्रकल्प - २,३६२.२०
- मुंबई-वाढवण द्रुतगती मार्ग कॉरिडॉर (उत्तन-विरार सी लिंक) - २,०००.००
- मुंबई ते समृद्धी द्रुतगती मार्ग : साकेत ते आमणे जोड रस्ता - ५००.००
- पूर्व मुक्त मार्ग विस्तार (छेडा नगर, घाटकोपर ते ठाणे) - १,१०६.७५
- कल्याण-मुरबाड ते बदलापूर रस्ता (वालधुनी नदीलगत उन्नत रस्ता) - २००.००
- गायमुख ते पायगाव खाडी पूल - ६८२.१०
- कसारवडवली, ठाणे ते खारबाव खाडी पूल - ८४०.७१
- कोलशेत, ठाणे ते काल्हेर, भिवंडी खाडी पूल - १०५.५१
- राष्ट्रीय महामार्ग-४ ते काटई नाका उन्नत रस्ता - ९००.००
- एकूण - ₹.१२,८१६.५३

**ग्रोथ हबच्या माध्यमातून एमएमआरला नवा आकार देणे (मुंबई ३.०)**
- केएससी (कनार्ळा-साई-चिरनेर) नवी वसाहत - ४,०००.००
- रायगड पेण विकास केंद्र - ५००.००
- खारबाव एकात्मिक बिझनेस पार्क - १००.००
- एकूण - ४,६००.००

**माहिती तंत्रज्ञान**
- एकात्मिक डिजिटल डिलिव्हरी कार्यक्रम (आयडीडीपी), प्रादेशिक माहिती प्रणाली (आरआयएस), ईआरपी प्रणाली आणि इतर उपक्रम
- एकूण तरतूद - २३५.३४ कोटी रुपये

**जलस्रोत आणि प्रादेशिक शाश्वतता**
- सूर्या प्रादेशिक जलपुरवठा योजना - २६७.०० कोटी
- देहरजी मध्यम प्रकल्प - २४७.०७ कोटी
- पोशीर धरण व अन्य प्रकल्प - ४६६.८० कोटी
- एकूण तरतूद - ९८०.८७ कोटी

या प्रकल्पांच्या माध्यमातून मीरा-भाईंदर, वसई-विरार, पालघर आणि लगतच्या परिसरात दीर्घकालीन जलसुरक्षा अधिक मजबूत होण्याची अपेक्षा आहे.

**एमएमआर एकात्मिक मेट्रो नेटवर्कच्या प्रमुख मार्गिका**
- मेट्रो २अ मार्गिका (डी. एन. नगर ते दहिसर) - ४५.१९ कोटी
- मेट्रो २ब मार्गिका (डी. एन. नगर ते मंडाळे) - १,२२४.६० कोटी
- मेट्रो ४ मार्गिका (वडाळा-कसारवडवली) - ३,६३०.७१ कोटी
- मेट्रो ४अ मार्गिका (कसारवडवली-गायमुख) - १७६.५४ कोटी
- मेट्रो ५ मार्गिका (ठाणे-भिवंडी-कल्याण) - १,३०९.३० कोटी
- मेट्रो ५अ मार्गिका (विस्तार) (दुगार्डी ते उल्हासनगर) - १८३.३५ कोटी
- मेट्रो ६ मार्गिका (स्वामी समर्थ नगर-कांजुरमार्ग) - २,४०७.७८ कोटी
- मेट्रो ७ मार्गिका (अंधेरी (पूर्व) ते दहिसर (पूर्व)) - २४.०५ कोटी
- मेट्रो ९ आणि ७अ मार्गिका (दहिसर-मीरा-भाईंदर / अंधेरी-सीएसटी विमानतळ) - १,१५१.८७ कोटी
- मेट्रो १० मार्गिका (गायमुख ते मीरा रोड) - १००.०० कोटी
- मेट्रो १२ मार्गिका (कल्याण ते तळोजा) - १,०५४.५४ कोटी
- मेट्रो १३ मार्गिका (घोडबंदर ते विरार) - २००.०० कोटी
- मेट्रो १४ मार्गिका (कांजुरमार्ग ते बदलापूर) - ५००.०० कोटी
- मंडाळे मेट्रो भवन - ४०३.३१ कोटी
- मालवणी, मालाड व मंडाळे येथील कर्मचारी निवास - २४८.९१ कोटी
- कल्याण शिळफाटा जंक्शन ते राजनोली चौक, भिवंडी उड्डाणपूल - १५०.०० कोटी
- ट्रान्सपोर्ट स्टॅकः डिजिटल मोबिलिटी प्लॅटफॉर्म - २५.०० कोटी
- मेट्रो नियोजन व मल्टि-मॉडेल एकत्रीकरण डिझाइन - ९१९.६३ कोटी
- मेट्रो ७ उन्नत पादचारी पूल (एफओबी) - ८४.१० कोटी
- एकूण - १३,८३८.८८ कोटी

# एमएमआरडीएचा शिलकीचा अर्थसंकल्प

## ४८,०७२.५७ कोटींचा अर्थसंकल्प सादर, विकास प्रकल्पांसाठी ८७ टक्के तरतूद

**बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) सोमवारी २००२६-२७ या आर्थिक वषासाठी ४८,०७२.५७ कोटींचा अर्थसंकल्प सादर केला. २०१७-१८ नंतर प्रथमच हा अर्थसंकल्प शिलकीचा सादर करण्यात आला आहे. तर १७ लाखांचा अधिशेष साध्य करण्यास प्राधिकरणास यश आले आहे.



उपमुख्यमंत्री तथा एमएमआरडीएचे अध्यक्ष एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत १६० वी वार्षिक सर्वसाधारण सभेची बैठक झाली. यावेळी उपमुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, प्रधान सचिव नविन सोना, एमएमआरडीएचे आयुक्त संजय मुखर्जी, अतिरिक्त आयुक्त अश्विन मुदगल, विक्रमकुमार आदी अधिकारी उपस्थित होते.

४८,०७२.५७ कोटींचा अपेक्षित आर्थिक प्राप्ती आणि ४८,०७२.४० कोटींच्या प्रस्तावित खचार्मुळे अर्थसंकल्पात १७ लाखांचा अधिशेष दर्शविण्यात आला आहे. जमिनीच्या वापरातून संरचित निधी उभारणी, अर्बन ट्रान्सपोर्ट फंड (यूटीएफ) बळकटीकरण, प्रकल्पांशी संबंधित महसुलात झालेली सुधारणा, तसेच आंतरराष्ट्रीय भागीदारी आणि संस्थात्मक वित्तपुरवठ्याच्या माध्यमातून उभारलेले भांडवल यामुळे हा अधिशेष साध्य झाला आहे.

विकास प्रकल्प व योजनांसाठी एकूण खर्चाच्या ८७.४२ टक्के इतकी म्हणजेच ४२,०२६.१४ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. ४८,०७२.५७ कोटींची प्रस्तावित अर्थसंकल्पीय तरतूद २०२५-२६ साठीच्या ३०,३१६.१८ कोटींच्या सुधारित अंदाजापेक्षा ५८.५७ टक्के अधिक आहे. तसेच ४८,०७२.४० कोटींचा प्रस्तावित खर्च मागील वषार्तील ३१,३१३.१३ कोटींच्या सुधारित अंदाजाच्या तुलनेत ५३.५२ टक्के जास्त आहे.

आर्थिक वर्ष २०१७-१८ ते २०२६-२७ या कालावधीत प्राधिकरणाला बहुतांश वर्षे तुटीचा सामना करावा लागला. या काळात काही वर्षांत तूट खूपच मोठी होती. मात्र, सातत्याने प्रयत्न केल्यानंतर अखेर आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये प्राधिकरणाने आर्थिक समतोल साधत ०.१७ कोटी इतका किरकोळ अधिशेष नोंदवला.

२०२६-२७ च्या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून प्रादेशिक पातळीवर समन्वयित परिवर्तन धोरणाला वेग देण्यात आला आहे. यामध्ये वाहतूक व्यवस्था, आर्थिक विकेंद्रीकरण, जल सुरक्षा, हवामान बदलांशी सामना करण्याची क्षमता तसेच गृहनिमार्णातील सुधारणा या घटकांचे एकत्रित नियोजन करण्यात आले आहे.

> "२०१७-१८ नंतर प्रथमच सादर झालेला एमएमआरडीएचा अधिशेष अर्थसंकल्प हा संस्थात्मक वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा आहे. या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून जागतिक पातळीवरील गुंतवणूकदारांचा विश्वास आणि पायाभूत सुविधांवर आधारित दीर्घकालीन विकासदृष्टी प्रतिबिंबित होते. यामुळे मुंबई महानगर प्रदेशाला आधुनिक, गुंतवणुकीसाठी सज्ज आणि आंतरराष्ट्रीय गुंतवणूक आकर्षित करू शकणारा शहरी प्रदेश म्हणून स्थान प्राप्त झाले आहे."
>
> **देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

> "अर्थसंकल्पातील ८७ टक्के तरतूद थेट प्रकल्पांसाठी करण्यात आल्याने प्राधान्यक्रम स्पष्ट असलेला आणि जबाबदारीचे भान असलेला दिसून येतो. ग्रोथ हब संकल्पनेअंतर्गत एमएमआरडीएने नियोजित प्रादेशिक विस्ताराचा नवा मापदंड प्रस्थापित केला आहे."
>
> **एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री आणि एमएमआरडीएचे अध्यक्ष**

> "हा अर्थसंकल्प वित्तीय शिस्त, संतुलित भांडवल उभारणी आणि सातत्यपूर्ण पायाभूत सुविधा अंमलबजावणीचा परिणाम आहे. एकीकडे वाहतूक जोडणी विस्तारत असताना, मुंबई ३.०च्या माध्यमातून विकासाचे विकेंद्रीकरण आणि प्रादेशिक शाश्वततेचे बळकटीकरणही करण्यात येत आहे. या अर्थसंकल्पामुळे आर्थिक ताणाच्या टप्प्यातून आर्थिक स्थैर्याकडे संक्रमण होत असून, विकासाचा वेगही व्यापक पातळीवर कायम राखण्यात आला आहे."
>
> **डॉ. संजय मुखर्जी, एमएमआरडीए आयुक्त**

## मुंबईतील कमर्शियल झोपड्यांकडून ७० टक्के मालमत्ता कराची वसूली

**मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबईतील पात्र झोपड्या महापालिकेच्या मालमत्ता कराच्या कक्षेत येत नसल्या तरी अनेक झोपड्यांच्या जागांचा कमर्शियल वापर केला जात आहे. त्यामुळे निवासी वगळता कमर्शियल वापराच्या झोपड्यांना मालमत्ता कर आकारण्याचा निर्णय घेत महापालिकेच्यावतीने मालमत्ता कराची आकारणी केली जाते. आता १० हजार ७७० मालमत्तांना कराची आकारणी करण्यासाठी नोटीस बजावली असून यासर्वांकडून आतापर्यंत ३२ कोटी ०३ लाख रुपयांच्या मालमत्ता कराची वसूली करण्यात आली आहे.



मुंबईतील एकूण कर आकारल्या जाणाऱ्या कमर्शियल झोपड्याः १०,७७० एकूण मालमत्ता कराची आकारणी : ५३ कोटी ४३ लाख रुपये वसूल करण्यात आलेल्या मालमत्ता कराची आकारणी : ३२ कोटी ०३ लाख रुपये

मुंबई महापालिकेने ५०० चौरस फुटाच्या घरांना मालमत्ता करमाफी दिली असून सध्या झोपडपट्टयांमध्ये कोणत्याही प्रकाराचा मालमत्ता कर आकारला जात नाही. या झोपडपट्टयांना ठोकपणे मालमत्ता कराची आकारणी केली जावी अशी मागणी होत असली तरी प्रत्यक्षात ५०० चौरस फुटाच्या घरांना करमाफी असल्याने झोपड्यांना याची आकारणी केली जात नाही. परंतु अनेक झोपड्यांमध्ये निवासी ऐवजी कमर्शियल वापर मोठ्याप्रमाणात होत असून अशाप्रकारे कमर्शियल वापर होत असलेल्या झोपड्यांना मालमत्ता कर आकारणी केली जावी अशाप्रकारचा निर्णय महापलिका प्रशासनाने घेतला आहे. त्यानुसार महापालिका आयुक्त तथा प्रशासन भूषण गगराणी यांनी कमर्शियल झोपड्या या मालमत्ता कराच्या कक्षेत आणल्या जाव्यात अशाप्रकारचा निर्णय घेतला आहे.

मात्र, आतापर्यंत महापालिकेच्या २६ प्रशासकीय विभाग कार्यालयाच्या हद्दीतील कमर्शियल झोपड्यांचा सर्वे करण्यात आला. त्यानुसार सर्वप्रथम ७३६४ कमर्शियल झोपड्यांवर २७ कोटी ०६ आणि त्यावरील दंड ४ कोटी ७१ लाख रुपये अशाप्रकारे एकूण ३१ कोटी ७७ लाख ६१ हजार रुपयांचा मालमत्ता कराची आकारणी करण्यात आली होती. त्यानंतर १ मार्च २०२५ पासून त्यात २६७५ कमर्शियल झोपड्यांचा समावेश करण्यात आला. या नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या कमर्शियल झोपड्यांचा २० कोटी १३ लाख रुपये आणि त्यावरी दीड लाख रुपयांचा दंड अशाप्रकारे २१ कोटी ६६ लाख रुपयांच्या मालमत्ता कराची आकारणी करण्यात आली आहे.

त्यामुळे एकूण १० हजार ७७० कमर्शियल झोपड्यांसाठी आकारल्या जाणाऱ्या मालमत्ता कराची आकारणी ही ५३ कोटी ४३ लाख रुपयांची होती. त्यातील आतापर्यंत ३२ कोटी रुपये आणि त्यावरील दंड २ लाख ७८ हजार रुपये अशाप्रकारे एकूण ३२ कोटी ०३ लाख रुपयांचा मालमत्ता कराची रक्कम करनिर्धारण व संकलन विभागाच्यावतीने वसूल करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे वांद्रे बेहरामपाडा, गरीब नगर, खेरवाडी तसेच धारावी, चेंबूर चिता कॅम्प,दहिसर गणपत पाटील नगर, शिवाजी नगर बैंगनवाडी, गोवंडी, कुर्ला आदी झोपडपट्टयांमध्ये मोठ्याप्रमाणात निवासी बरोबरच कमर्शियल वापर केला जातो. त्यामुळे सरसकट सर्वच झोपड्यांना आणि त्यावरील सर्वच झोपड्यांमधील माळ्या माळ्यांवर असलेल्या कमर्शियल वापराकरता हा कर आकारणी केली जात आहे.

महापालिका अतिरिक्त आयुक्त अश्विनी जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुक्त विश्वास शंकरवार आणि सहायक आयुक्त गजानन बेल्लाळे यांनी नियमित मालमत्ता कराची वसूल करतानाच कमर्शियल झोपड्यांकडूनही आतापर्यंत ७० टक्के कराची रक्कम वसूल केली आहे.

## येत्या बुधवारी महापालिकेवर १० स्वीकृत नगरसेवकांची होणार नियुक्ती

**मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबई महापालिकेत स्वीकृत नगरसेवकांची संख्या पाच वरून वाढवून दहा करण्याचा निर्णय घेण्यात आला असून यासाठी दहा स्वीकृत नगरसेवकांच्या नावाची घोषणा येत्या बुधवार २५ फेब्रुवारी रोजी महापालिका सभागृहात केली जाणार आहे. त्यामुळे कोणत्या पक्षाकडून कुणाची वर्णी लागते याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

मुंबई महापालिकेत सध्या २२७ नगरसेवक निवडून आले असून आजवर महापालिकेत पाच स्वीकृत नगरसेवकांची नियुक्ती प्रत्येक पक्षाच्या गणसंख्येवर आधारीत कोट्यानुसार केली जाते. परंतु यंदा नगरविकास खात्याने अधिसूचना जारी करून स्वीकृत नगरसेवकांची संख्या दुप्पट वाढवत दहा एवढे सुचित केले आहे. त्यामुळे आता २२७ नगरसेवकांची निवड झाल्यानंतर महापालिका सभेला सुरुवात झालेली आहे.त्यामुळे पहिल्या सभेपासून पुढील एक महिन्याच्या आतमध्ये स्वीकृत नगरसेवकांची निवड होणे आवश्यक आहे. त्यानुसार महापालिका सभागृहात येत्या २५ फेब्रुवारी रोजी स्वीकृत नगरसेवकांच्या नावाची घोषणा केली जाणार आहे. यासाठी स्वीकृत नगरसेवकांचे अर्ज प्राप्त होऊन आयुक्तांच्या माध्यमातून या अर्जाची छाननी झाल्यानंतर पात्र अर्जदारांची नावे सभागृहापुढे मांडली जाणार आहे. त्यामुळे यासाठी येत्या सोमवारी स्वीकृत नगरसेवकांचे अर्ज सादर केले जाणार आहे.

स्वीकृत नगरसेवक पदासाठी वकील, प्रोफेसर, डॉक्टर किंवा खासगी स्वयंसेवी संस्थेचे पदाधिकारी, प्रमुख तसेच मंडळाचे प्रमुख अशाप्रकारची अर्हता आहे. त्यामुळे प्रत्येक पक्षाच्या कोट्यानुसार या अर्हतेत बसणाऱ्या किती माजी नगरसेवकांचा आणि पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची यामध्ये वर्णी लागते याकडे सर्वांचे लक्ष आहे. मुंबई महापालिकेत भाजप पक्षाचे अधिक नगसेवक निवडून आल्यामुळे त्यांचे चार स्वीकृत नगरसेवक महापालिकेवर जात आहेत, तर त्याखालोखाल उबाठाचे तीन,राष्ट्रवादी कॉँग्रेसची मदत घेतल्यामुळे शिवसेनेचा एक जायचा तिथे आता दोन जाणार आहेत. तर कॉँग्रेसचा एक अशाप्रकारे स्वीकृत नगरसेवक नियुक्त केले जाणार आहेत.

## अतिक्रमणमुक्त पदपथ आणि स्वच्छतेबाबत प्रशासनाचे दादरकरांकडून कौतुक



**मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबईतील काही प्रमुख पदपथांवरील अतिक्रमणे हटविण्यात आल्यामुळे अनेक रस्ते व पदपथ फेरीवाला-मुक्त झाले असून नागरिकांना आता सुरक्षित, मोकळ्या व अडथळारहित मागार्ने चालण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. या सकारात्मक सुधारणांबाबत नागरिकांनी समाधान व्यक्त करत महानगरपालिका प्रशासनाच्या प्रयत्नांचे मनापासून कौतुक केले आहे. विशेषतः दादर माहिम भागातील जनतेने महापालिका अतिरिक्त आयुक्त डॉ अश्विनी जोशी यांना पत्र तसेच निवेदन देत एकप्रकारे कौतूक आणि समाधान व्यक्त केले आहे.

महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्या नेतृत्वाखाली तसेच अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली घनकचरा व्यवस्थापन व अतिक्रमण निर्मूलन विभाग समन्वयाने आणि प्रभावीपणे कार्यरत आहेत. स्वच्छता मोहिमांची काटेकोर अंमलबजावणी, नियमित निरीक्षण, क्षेत्रनिहाय विशेष पथकांची नियुक्ती, तसेच नागरिकांच्या तक्रारींवर तत्काळ कार्यवाही यामुळे रस्ते, चौक व सार्वजनिक ठिकाणी स्वच्छतेचा दर्जा लक्षणीयरित्या उंचावला आहे. यासोबतच पदपथांवरील अतिक्रमण हटविण्यासाठी नियोजनबद्ध कारवाई, पोलीस व संबंधित विभागांशी समन्वय, तसेच पुनरावृत्ती टाळण्यासाठी सातत्यपूर्ण देखरेख राबविली जात आहे. या सर्व उपक्रमांमुळे प्रशासनाच्या कार्यक्षमतेबद्दल नागरिकांमध्ये विश्वास आणि समाधान वाढत आहे.

सार्वजनिक स्वच्छतेमध्ये मोठी सुधारणा होत आहे. स्वच्छतेचे दृश्य आणि दूरगामी परिणाम नागरिकांना जाणवू लागले आहेत.

या सकारात्मक बदलाबाबत नागरिकांनी अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी यांना पत्र तथा संदेश पाठवून महानगरपालिका प्रशासनाचे कौतुक केले आहे. विशेषतः जी उत्तर विभागातील रहिवाशांनी घनकचरा व्यवस्थापन तसेच फेरीवाल्यांविषयक प्रश्नांमध्ये लक्षणीय सुधारणा झाल्याबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

जी उत्तर विभागातील स्वातंत्र्यवीर सावरकर मार्ग, लेडी जमशेठजी मार्ग, कटारिया मार्ग, ६० फुटी मार्ग, ९० फुटी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज उद्यान (शिवाजी पार्क) परिसरातील रस्ते अधिक स्वच्छ झाले आहेत. काही प्रमुख पदपथ फेरीवालामुक्त झाले आहेत. वाहतूक पोलिस तैनात असल्याने वाहतूक सुरळीत झाल्याबद्दल नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

घनकचरा व्यवस्थापन विभाग वर्षभर म्हणजेच ३६५ दिवस सातत्याने कार्यरत आहे. गत वर्षभरात विविध प्रशासकीय विभगात लोकसहभागातून स्वच्छता मोहिमा राबविण्यात येत आहेत. त्याद्वारे सार्वजनिक स्वच्छता कार्यवाहीस आणखी व्यापक स्वरुप देत नागरी भागातील स्वच्छतेवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. या अंतर्गत रस्ते, पदपथ धूळमुक्त करण्याबरोबरच बेवारस वाहनांची विल्हेवाट, सार्वजनिक प्रसाधनगृहांची दिवसातून ३ वेळा स्वच्छता व निर्जंतुकीकरण, विनापरवाना जाहिरात फलकांवर कारवाई, सार्वजनिक प्रसाधनगृहांची स्वच्छता, उद्यान व क्रीडांगणांची निगा, निर्मळ कर्मचारी वसाहत, फेरीवाला विरहित क्षेत्र, राडारोडा मुक्त परिसर आदी कार्यवाही केली जात असल्याचे अतिरिक्त आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी यांनी स्पष्ट केले.

## तानसा धरणाची सुरक्षा अधिक भक्कम

### धरण परिसरात फेन्सिंगचे जाळे, पालिका २६ लाख रुपये खर्च करणार

**मुंबई। प्रतिनिधी,**



मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सात धरणापैकी तानसा धरण. धरण क्षेत्र परिसरात प्रवेश बंदी असूनही बेकायदा प्रवेश रोखण्यासाठी आता धरण परिसरात फेन्सिंग बसवण्याचा निर्णय पालिका प्रशासनाने घेतला आहे. यासाठी पालिका प्रशासन तब्बल २६ लाख ५० हजार २५३ रुपये खर्च करणार आहे.

मोडक सागर, मध्य वैतरणा, अप्पर वैतरणा, भातसा, तानसा, तुळशी व विहार या सात धरणातून मुंबईला पाणीपुरवठा होतो. मुंबईकरांना स्वच्छ व शुद्ध पाणीपुरवठा करणे पालिका प्रशासनाचे कर्तव्य आहे. धरण परिसर हा अत्यंत संवेदनशील व महत्त्वाचा पाणीपुरवठा स्त्रोत असल्याने अनधिकृत प्रवेश रोखणे आणि कठोर सुरक्षा करणे यासाठी सुरक्षेसंदर्भात विविध उपाययोजना करण्यात येतात. त्याचाच एक भाग म्हणजे धरण परिसरातील संवेदनशील ठिकाणी मजबूत फेन्सिंग उभारण्यात येत आहे. फेन्सिंगसाठी गंजरोधक कोटिंग केलेल्या लोखंडी जाळीचा वापर करण्यात येत असून, ती सिमेंट कॉंक्रीट खांबांवर बसवली जात आहे. यामुळे वन्यप्राण्यांची तसेच अनधिकृत व्यक्तींची ये-जा रोखण्यास मदत होणार आहे, असे पालिकेच्या जल विभागातील अधिकाऱ्याने सांगितले.

धरण परिसरात सुरक्षेचे नियम अधिक कडक करण्यात आले असून, फेन्सिंग पूर्ण झाल्यानंतर नियमित देखभाल व तपासणी केली जाणार आहे.

## किनारपट्टी भागातील वीज वाहिन्या होणार भूमिगत




**वसई। प्रतिनिधी,**

वसई विधानसभेच्या आमदार स्नेहा दुबे पंडीत यांच्या उपस्थितीत वसई पश्चिम येथील जनसंपर्क कार्यालयात महावितरणच्या विविध कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. किनारपट्टी भागातील ओव्हरहेड वीज वाहिन्या भूमिगत करण्याचे काम लवकरच सुरू होणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. गुरुवारी झालेल्या या बैठकीस महावितरणचे अध्यक्ष अभियंता संजय खंदारे व संबंधित अधिकारी उपस्थित होते. बैठकीत वसई मंडळात सुरू असलेल्या तसेच येत्या काळात हाती घेण्यात येर्णाया विविध प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला. बंच कंडक्टरच्या कामांची प्रगती, तांत्रिक बाबी आणि नवीन प्रस्तावित कामांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

## वसईत ६५ वर्षीय महिलेची घरात घुसून निर्घृण हत्या

**वसई। प्रतिनिधी,**

आत्या ओरडल्याने संतापलेल्या अल्पवयीन भाच्याने मित्राच्या मदतीने तिची हत्या केल्याची घटना वसईत उघडकीस आली आहे. याप्रकरणी माणिकपूर पोलिसांनी अल्पवयीन भाच्यासह त्याच्या मित्राला अटक करून पुढील तपास सुरू असल्याची माहिती दिली आहे.

मयत महिला दुर्गा बनसोडे (65) या वसई पश्चिमेच्या बंहामपूर गावातील भिमाई बंगल्यात राहत होती. त्यांची विवाहित मुलगी बोईसरमध्ये तर मुलगा वालीव येथे राहत असल्याने बनसोडे एकट्याच बंगल्यात राहत होत्या. सोमवारी सकाळी त्यांचा मृतदेह बंगल्यात आढळून आला होता.

चौकशी दरम्यान बनसोडे यांचा 15 वर्षांचा भाचा त्यांना अधूनमधून भेटायला येत असल्याचे उघड झाले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार रविवारी भाचा नेहमीप्रमाणे आत्याला भेटायला आला होता. क्षुल्लक कारणावरून आत्या त्याला ओरडली होती. त्यामुळे त्याला राग आला आणि त्याने आपल्या मित्राला बोलावून घेतले. आत्या बेसावध असताना भाच्याने मागून तिच्या डोक्यावर बांबूने वार केला. त्यात बनसोडे यांचा जागीच मृत्यू झाला.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधीन राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com